बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ११ | बुधवार,दि.१९ फेब्रुवारी २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## जि.प.विषय समिती सभापतींचे खाते वाटप सोमवारला

### विशेष सभा बोलाविली, इतर समित्यांवर घेणार सदस्य

**गोंदिया** : जिल्हा परिषद विषय समिती सभापतिपदाची निवडणूक १० फेब्रुवारी घेण्यात आली. यानंतर आता सभापतींना खाते वाटप करण्यासाठी २४ फेब्रुवारी रोजी जि.प. अध्यक्षांनी विशेष सभा बोलाविली आहे. या सभेत अर्थ व बांधकाम, शिक्षण व आरोग्य आणि कृषी पशुसंवर्धन या तीन सभापतिपदांचे वाटप केले जाणार आहे. सभापती निवडणुकीत भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला दूर ठेवल्याने आता जि.प. उपाध्यक्षांना नेमके कुठले खाते दिले जाते, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

गोंदिया जिल्हा परिषदेत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची सत्ता आहे. अडीच वर्षांपूर्वी ठरलेल्या यांच्यातील युतीच्या फार्म्युल्यानुसार अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक २४ जानेवारीला पार पडली. यात अध्यक्षपदी भाजपचे लायकराम भेंडारकर, तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश हर्षे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. हाच फार्म्युला विषय समिती सभापतिपदाच्या निवडणुकीत कायम राहणार अशी चर्चा होती; पण १० फेब्रुवारीला पार पडलेल्या विषय समिती सभापतिपदाच्या निवडणुकीत भाजपने चारही सभापतिपदी भाजपच्याच सदस्यांचे अर्ज भरले; तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला सभापतिपदापासून दूर ठेवल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला; पण या निवडणुकीनंतर भाजपने भंडाऱ्याचा हिशेब गोंदियात चुकता केल्याची चर्चा जि.प.च्या वर्तुळात होती. आ. विनोद अग्रवाल हे भाजपमध्ये परतल्याने त्यांच्या चावी संघटनेचे भाजपमध्ये विलीनीकरण झाले. त्यामुळे जिल्हा परिषदेत भाजपचे संख्याबळ वाढले. ३२ सदस्याचे भाजपकडे बहुमत असल्याने आता ताकद वाढली.भाजपकडे ३२ सदस्यांचे बहुमत असल्याने त्यांना कुणाच्या आधाराची गरज राहिली नाही. त्यामुळे त्यांनी सभापतिपदी भाजपच्या चारही सदस्यांची वर्णी लावली. तर आता खातेवाटपातही राष्ट्रवादी काँग्रेसला कृषी व पशुसंवर्धन खाते दिले जाणार असल्याची चर्चा आहे.



### बांधकाम सभापतिपदी भगत

**जि.प.च्या एकूण पाच विषय समिती सभापतिपदांपैकी महिला व बालकल्याण सभापतिपदी पौर्णिमा ढेंगे व समाजकल्याण सभापतिपदी रजनी कुंभरे यांची निवड करण्यात आली. तर आता अर्थ व बांधकाम, शिक्षण व आरोग्य आणि कृषी व पशुसंवर्धन सभापतिपदाचे वाटप २४ फेब्रुवारीला होणार आहे. यात अर्थ व बांधकाम सभापतिपदी डॉ. लक्ष्मण भगत, तर शिक्षण व आरोग्य सभापतिपदी दीपा चंद्रिकापुरे यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे. तर जि.प. उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांच्याकडे कृषी व पशुसंवर्धन विभाग राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

### विविध समित्यांवर घेणार सदस्यांना

**जिल्हा परिषदेतील जलव्यवस्थापन समितीसह विविध समित्यांमध्ये सदस्यांना घेण्यात येणार आहे. ही निवडसुद्धा जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे.**

## शासनाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवा-राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

गोंदिया : शासन राबवित असलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन लोकाभिमुख कामांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी प्रशासनाची व संबंधित विभागाची असल्याने शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म विभागाने कुशल कामे करावीत, असे निर्देश गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात (ता.१८) शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म विभागांचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले, जि.प.सभापती लक्ष्मण भगत, जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले, शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करुन यशस्वीपणे राबवा. पीएम श्री शाळा योजनेत गोंदिया जिल्ह्यात २० शाळा असून यावर खर्च झालेला आहे. यामुळे शाळांची पटसंख्या वाढलेली आहे. सदर २० शाळांचे विकासात्मक अंकेक्षण (ऑडिट) करण्यात यावे अशा सूचना त्यांनी यावेळी शिक्षण विभागाला दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार पीएम श्री शाळा उपक्रमाच्या धर्तीवर सीएम श्री शाळा उपक्रम सुरु करण्यात यावा असे त्यांनी सांगितले.राज्यात ४७८ शाळेत आदर्श शाळा उपक्रम राबविण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यात एकूण १६४२ शाळा असून आदर्श शाळा उपक्रमांतर्गत जिल्ह्यात ९ छोट्या व ९ मोठ्या शाळांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. या शाळांचे सुध्दा विकासात्मक अंकेक्षण (ऑडिट) करण्यात यावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.गोंदिया जिल्ह्यात २९० विविध कार्यकारी सहकारी संस्था असून ३९ आदिवासी सहकारी संस्था आहेत. जिल्ह्यात अशा एकूण ३२९ सहकारी संस्था आहेत. त्यापैकी १२१ सहकारी संस्थांचे संगणकीकरण झाले आहे. हे आंतरराष्ट्रीय सहकारीता वर्ष आहे. याअंतर्गत १२ कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या सर्व उपक्रमांची माहिती लोकप्रतिनिधींना देण्यात यावी असे त्यांनी सांगितले.गोंदिया जिल्ह्यात एकूण ३३ रेती/वाळूचे घाट आहेत. रेती चोरी संदर्भातील अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर जिल्हा प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले. पंडित दिनदयाल उपाध्याय योजनेची जिल्ह्यातील नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात यावी असे सांगून ते म्हणाले की, जंगली जनावरांमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे वन विभागाने लवकरात लवकर सर्व्हे करुन नुकसान भरपाई देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी संबंधित विभागाला दिले.यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी शिक्षण विभागांतर्गत शाळा, शिक्षक व विद्यार्थी, जिल्हा परिषद शिक्षक स्थिती, विद्यार्थी अपार आयडी बाबत स्थिती, शाळांमध्ये उपलब्ध भौतिक सुविधा, पीएम श्री योजना, दप्तरमुक्त शनिवार, अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा बांधकाम , जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये एक मॉडेल स्कुल जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विकसीत करणे, प्रथम संस्थेच्या सहकार्याने जिल्ह्यातील शाळांचा गुणवत्ता विकास, जिल्ह्यात कार्यरत असेलेले प्रमुख खनिज व गौण खनिज खाणपट्टे, अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणे, जिल्हा खनिज प्रतिष्ठान बाबत सद्यस्थिती, जिल्ह्यातील रेती/वाळू डेपोची सद्यस्थिती आदींबाबत सादरीकरणाद्वारे विस्तृत माहिती दिली.

## भंडारा जिल्ह्यात वाघ मृतावस्थेत आढळला

**भंडारा** :- जिल्ह्यात वाघ आणि वाघाच्या बछड्यांच्या मृत्यूचे सत्र थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. तुमसर तालुक्यातील नाका डोंगरी वनक्षेत्र अंतर्गत वाघ मृत अवस्थेत आढळून आला. यामुळे वनविभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.आठवडाभरात याच परिसरात चार वाघांचे बछडे आढळून आले होते. यातील दोघांचा मृत्यू झाला असून, दोन नागपूर येथील गोरेवाडा येथे उपचारसाठी हलविण्यात आले आहे.

सोमवारी भंडारा वन विभाग अंतर्गत येणाऱ्या नाकाडोंगरी वन-क्षेत्रातील सहवनक्षेत्र कवलेवाडा नियतक्षेत्र सीतासावंगी कक्ष क्रमांक ६५ राखीव वन येथे वाघ मृत अवस्थेमध्ये असल्याची माहिती गुराख्यामार्फत नाकाडोंगरी वनपरिक्षेत्राधिकारी यांना संध्याकाळी ५ वाजता देण्यात आली. वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. मृत वाघ हा नर असून त्याचे वय अंदाजे ३ ते ४ वर्षे असल्याचे समजते. वाघाच्या तोंडावर, मानेवर व मागील पायाला जखमा असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले. वाघाचे सर्व अवयव कायम असल्याचे समजते.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) च्या प्रमाणभूत कार्यपद्धती (SOP) नुसार गठित समितिद्वारे घटनास्थळ व मृत वाघाची पाहणी करण्यात आली. पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या चमूने वाघाचे शवविच्छेदन केले. वाघाच्या मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून, शवविच्छेद नंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होइल असे वनविभागाचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

मृत्यू दोन वाघांच्या झुंजित झाला असल्याची प्राथमिक शक्यता वर्तविण्यात येत आहे. या प्रकरणी वन्यजीव गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास उपवनसंरक्षक राहुल गवई भंडारा, यांचे मार्गदर्शनात प्रकाष्ठ निष्काशन अधिकारी रितेश भोंगाडे, नाका डोंगरी वनपरीक्षेत्रअधिकारी अपेक्षा शेंडे करीत आहे.

## मानुसकीला काळीला फासणारी घटना-ॲड.धर्मपाल मेश्राम

**गोंदिया** :- जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील म्हसगाव येथील शेतशिवारात ९ फेब्रुवारी २०२५ रोजी अनुसूचित जातीच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन जाळून मारण्याची घडलेली घटना ही अत्यंत अमानवीय व मानवतेला काळीमा फासणारी असून या घटनेचा मी निषेध व्यक्त करतो. तसेच अशा विकृत मानसिकतेच्या त्या आरोपीला कायद्यान्वये कठोरातील कठोर दंड देण्याचे प्रतिपादन राज्याचे अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी केले.

(ता.१६) येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना धर्मपाल मेश्राम म्हणाले की, अल्पवयीन मुलगी ही अनुसूचित जाती प्रवर्गाची आहे. आरोपी शकील मुश्ताक सिध्दीकी हा विकृत मानसिकतेचा असून त्याच्या विरोधात आरोपपत्र तयार करुन त्याला जामीन मिळू नये असे पोलीस उपअधीक्षक विवेक पाटील यांना निर्देशीत केले असल्याचे ते म्हणाले. आज आमगाव तालुक्यातील सदर मृत अल्पवयीन मुलीच्या स्वगावी मानेकसा येथे जाऊन पालक व कुटूंबियांची सांत्वना भेट घेतली. अत्यंत गरीब असलेले हे कुटूंब उदरनिर्वाहसाठी जवळपास ४० कि.मी.अंतरावरील गोरेगाव तालुक्यातील विटभट्टीवर मोलमजुरीचे काम करीत होते. दरम्यान त्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन मानुसकीला लाजविणारे कृत्य त्या आरोपीने केले. तसेच तिच्या पोटात ७ महिन्याचे गर्भ असतांना जीवंत जाळून विकृत मानसिकतेच्या त्या व्यक्तीने निर्घून खुन केले. अशा आरोपीला सुरक्षीत समाजाच्या दृष्टीने समाजात वावरण्याचे हक्क नाही. त्यामुळे पोलीस विभागाने आरोपीच्या विरोधात सर्व कठोर कलमे लावून कायदेशीर कारवाईचे निर्देश आजच्या बैठकीत दिले आहेत. या बैठकीत महसूल विभाग, जिल्हा महिला व बालकल्याण, पोलीस विभाग, सामाजिक न्याय विभाग आदी विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



संबंधित विभागाकडून माहिती घेतली असता, जिल्ह्यात अनेक अनाधिकृत विटभट्ट्या सुरु असल्याची माहिती मिळाली. या अनाधिकृत विटभट्ट्यांची कायदेशीर प्रक्रिया जिल्हाधिका?यांनी तपासावी असेही त्यांनी निर्देशीत केल्याचे सांगितले. गोंदिया जिल्ह्यात किती बाल कामगार काम करीत आहेत, यासंदर्भातील सर्वेक्षणाची माहिती तात्काळ अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे सादर करावे असेही निर्देशीत केले आहे. या प्रकरणी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यांनी कामचुकारपणा केल्यावर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. मेश्राम पुढे बोलतांना म्हणाले की, ९ फेब्रुवारी रोजी मुलीचे आई-वडील रावणवाडी पोलीस स्टेशन येथे गेले असता योग्य ते सहकार्य मिळाले नसल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे रावणवाडी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना याबाबत कारणे विचारण्यात येतील. चर्चेदरम्यान सदर मुलीच्या कुटूंबियांनी सांगितले की, त्या आरोपीने मुलीला दोन-तीन डॉक्टरांकडे वैद्यकीय तपासणीकरीता नेले होते. अशा अनाधिकृतपणे वैद्यकीय तपासणी करणाऱ्या चिकित्सकांचीही योग्य ती चौकशी करण्यात येईल. उपविभागीय अधिकारी गोंदिया यांना येत्या तीन दिवसात सदर कुटूंबाला जातीचा दाखला तयार करुन देण्याचे निर्देशीत केले आहे. तसेच समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यांना तात्काळ प्रभावाने सदर कुटूंबाला मदत देण्याचे निर्देशीत केले आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांना निवेदन

### ओबीसी अधिकार मंचसह ओबीसी बहुजन संघटनाचा एक दिवसीय धरणे आंदोलन




**गोंदिया** : वर्षानुवर्षांपासून ओबीसी वसतिगृहाची मागणी ओबीसी संघटनांकडून केली जात होती, ते वसतिगृह तर सुरु झाले. मात्र त्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना गेल्या सहा महिन्यापासून कुठल्याही प्रकारचा निर्वाह व भोजन भत्ता न मिळाल्याने त्यांच्यावर संकट आले आहे. त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महाराष्ट्रात ओबीसी आरक्षणाच्या २७ टक्क्यांमधील मूळ असलेल्या जागा मधून ३३ हजार ८३४ जागा कमी झाल्याने समाजाचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील हक्क हिरावून घेण्यात आले त्याकरीता जातनिहाय जनगणना करण्यात यावे. नॉन क्रिमिलेयरचीअट रद्द करण्यात यावे. याशिवाय ओबीसी विद्यार्थी विद्यार्थीनीना लागू करण्यात आलेल्या आधार योजनेचा निधी अद्याप न दिल्याने संकट ओढवल्याने आदी मागण्यांना घेत ओबीसी अधिकार मंच,ओबीसी सेवा संघ संघटनेसह जिल्ह्यातील सर्व ओबीसी बहुजनसंघटनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन १७ फेब्रुवारीला करण्यात आले. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व ओबीसी बहुजन कल्याण मंत्री यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात गोंदिया जिल्ह्यातील मानेकसा येथील मागास समाजातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन निर्मम हत्या करणाऱ्या आरोपीला कडक शिक्षा देण्यात यावे.तसेच गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नोकर भरतीमध्ये सामाजिक आरक्षण लागू करण्यात यावे. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून ओबीसी मुलां व मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन व निर्वाह भत्ता देण्यात यावे. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले आधार योजना लागू करण्यात यावी. सोबतच स्थानिक महाराष्ट्रत ओबीसी आरक्षणाच्या २७ टक्क्यांमधील मूळ असलेल्या जागा मधून ३३ हजार ८३४ जागा कमी झालेल्या आहेत. यात महानगरपालिका ६७ जागा, नगरपालिका १९२ जागा, नगरपंचायत १८२ जागा, जिल्हा परिषद १४३ जागा, पंचायत समिती ३४५ जागा व ग्रामपंचायतमधील ३२,९६० जागा कमी झाल्याने ओबीसींचे स्थानिक स्वराज्य संस्थामधील प्रतिनिधीत्व सरकारने हिरावून घेतले आहे. त्याकरीता ओबीसींची जनगणना करुन हा हक्क मिळवून देण्यात यावे. मराठा समाजाच्या लोकांना ओबीसीत सामावून घेण्याकरीता नेमलेल्या शिंदे समितीची मुदतवाढ रद्द करुन मराठा समाजाचे ओबीसीत घुसखोरी थांबवण्यात यावे.

महाज्योती संस्थेच्या माध्यमातून विदेशातील शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती स्वायत्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही लागून करण्यात यावे. ओबीसी बहुजन कल्याण मंत्रालयाचे जिल्हास्तरावर कार्यालय सुरु करुन तिथे अधिकारी व कमचारी वर्ग तत्काळ नियुक्त करण्यात यावे. स्थानिक स्वराज्यसंस्थामध्ये ओबीसी बहुजन कल्याण सभापती पद निर्माण करण्यात यावे, महाज्योती दूत योजना तालुकास्तरावर सुरु करण्यात यावे, आदी मागण्यांना घेऊन हे आंदोलन करण्यात आले.

### आंदोलनात यांचा सहभाग

**आंदोलनात ओबीसी अधिकार मंचचे सहसंयोजक अशोक लंजे, कैलास भेलावे, ओबीसी सेवा संघाचे राज्य संघटक सावन कटरे,नरेश परिहार, भारतीय पिछडा शोषित संघटनेचे प्रेमलाल साठवणे, ओबीसी सेवा संघाचे भुमेश ठाकरे, भुमेश शेंडे, ओबीसी महासभेचे अध्यक्ष राजीव ठकरेले, शालीकराम भेलावे, राजकुमार पटले, कमलेश बिसेन प्रमोद गुडधे, अजाबराव रिनाईत, महेंद्र बिसेन, भागचंद रहागंडाले, संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे, संजय बैतुले, मोहसीन खान, तुलाराम येरणे, मुनेश्वर कुकडे, रविंद्र तुरकर, सुनिल भरणे, उमेश कटरे, अनिल राणे, जिवनलाल शरणागत, डॉ डिगबंर पारधी, माधव फुंडे, कैलाश महेशकर, डॉ.एल.एस.तुरकर, भिमराव साखरे, भुमेश्वर शेंडे, सचिन नांदगाये, धर्मेश डोहरे, सौरभ रोकडे, सुनिल भोंगाडे, गौरवबिसेन, रमेशराव ब्राम्हणकर आदी उपस्थित होते.**





**या ओबीसींच्या एकदिवसीय धरणे आंदोलन मंडपाला राष्ट्रवादी काँग्रेस (अप)पक्षाचे ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, उपाध्यक्ष राजू गुल्हाने, सरचिटणीस प्रभाकर दोनोडे यांच्यासह इतर मान्यवरांनी भेट देत आंदोलन मंडळातील ओबीसी अधिकार मंच, ओबीसी सेवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.**






## राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा

नोंदणी क्रमांक १५९/०७/(एफ-७९७६)

### कार्यकारिणी मंडल (२०२५-२०३०) निर्वाचन की जाहिर सुचना

**राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा के आगामी कार्यकारिणी मंडल के निर्वाचन की प्रक्रिया निम्मानुसार है.**

| अनु.क्रं. | विवरण | तिथी | समय | स्थान |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारूप मतदाचा सुचि का प्रकाशन (मतदाता सुचि शुल्क रू.१०००/)-देकर प्राप्त की जा सकेगी | १८/०२/२०२५ | सुबह ११ बजे | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| २ | प्रारूप मतदाचा सुचिपर आक्षेप स्विकारणा | १८/०२/२०२५ से २१/०२/२०२५ | सुबह ११ से दो.२ बजे तक | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ३ | अंतिम मतदाचा सुचि का प्रकाशन (अंतिम मतदाता सुचि रू.१०००/-देकर प्राप्त की जा सकेगी) | २३/०२/२०२५ | सुबह ११ बजे | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ४ | विभिन्न पदों के उम्मीदवारी हेतु नामांकन आवेदन पत्रों का वितरण | २८/०२/२०२५ से २/०३/२०२५ तक | सुबह ११ से दो.२ बजे तक | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ५ | विभिन्न पदों के उम्मीदवारी हेतु नामांकन आवेदन पत्र स्विकार करने की तिथी | २८/०२/२०२५ से ७/०३/२०२५ तक | सुबह ११ से दो.२ बजे तक | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ६ | उम्मेदवारी नामांकन पत्र पर आक्षेप तथा निराकरण | ०९/०३/२०२५ | सुबह ११ से दो.२ बजे तक | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ७ | वैध उम्मेदारों की अंतिम सुचि | १०/०३/२०२५ | दो.२ बजे | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ८ | उम्मेदवारी वापस लेना | ११/०३/२०२५ | दो.१२ बजे से सायं.४ बजे तक | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| ९ | विभिन्न पदों हेतु उम्मेदवारों की अंतिम सुचि का प्रकाशन | ११/०३/२०२५ | सायं.५ बजे | पवार विद्यार्थी भवन, कुकडे ले-आऊट,नागपुर |
| १० | मतदान (जरुरुत पडने पर) | २३/०३/२०२५ | सुबह ७ बजे से दो.४ बजे तक | आम सभा स्थल, ग्राम पखारा जि.सिवनी(म.प्र) |
| ११ | मतगणना एवं निर्वाचित उमेदवारों की घोषणा | २३/०३/२०२५ | सायं.६ बजे के पश्चात | आम सभा स्थल, ग्राम पखारा जि.सिवनी(म.प्र) |

महासभा के सभी साधारण/आजीवन)दानशुर/पालक सदस्यों से निवेदन है कि, उपरोक्त निर्वाचन प्रक्रिया में सम्मिलित होकर रा.प.क्ष.महासभा को सशक्त बनावे.

**एडवोकेट हेमंत रहांगडाले**

**निर्वाचन अधिकारी, राष्ट्रीय पवार क्षत्रीय महासभा भारत**

## संपादकीय

# अभिजात मराठीचा गौरव सोहळा!

मराठी भाषेचा प्रवास हा केवळ काही शतकांचा नाही, तर तो संस्कृती, इतिहास, साहित्य, विचारधारा आणि चळवळी यांचा जाज्वल्य इतिहास आहे. शिवकालीन युद्धनीती असो, संत वाययातील अध्यात्म असो, की लोकमान्य टिळक, सावरकर यांच्या लेखणीतील क्रांतीचा हुंकार–मराठीने प्रत्येक युगात आपली छाप सोडली आहे. आजही ही भाषा डिजिटल युगात नव्या वाटा शोधत व्यापक रूप धारण करत आहे.

अभिजाततेचा गौरव मिरवणाऱ्या या भाषेचा आणि तिच्या समृद्ध साहित्यपरंपरेचा भव्य उत्सव म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन! मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रवासियांचे हृदयस्पंदन आहे. यावर्षी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नवी दिल्लीत होत आहे, आणि या संमेलनाला अनेक कारणांमुळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. हे संमेलन मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे. केंद्र सरकारकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे उद्घाटन हा अभिमानाचा क्षण असेल. संपूर्ण भारतभर आणि जगभर पसरलेल्या मराठी भाषिकांसाठी हे संमेलन प्रेरणादायी ठरेल. संत साहित्य आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा पाया मराठी भाषेच्या समृद्धीचा पाया संतांनी घातला. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृतातील गीतेचे तत्त्वज्ञान मराठीत आणत ज्ञानेश्वरी रचली. संत ज्ञानेश्वरांनी मराठीची महती सांगताना अभिमानाने म्हटले “माझ्या मराठीचिया बोलू कवतुके, परि अमृतातेही पैजा जिंके!’ संत तुकारामांच्या अभंगांमध्ये समाजमन घडवण्याचे सामर्थ्य होते, तर समर्थ रामदासांच्या लेखणीत राष्ट्रवादाची चेतना होती. या संतवाणीने केवळ धर्मप्रसार केला नाही, तर मराठी मनाच्या विचारसरणीला एक नवा आयाम दिला.

इतिहास, काव्य, कथा आणि क्रांती–मराठी साहित्याचा अविरत प्रवास मराठी साहित्य हे केवळ संतवाणीपुरतेच सीमित राहिले नाही. सुरेश भटांच्या काव्यपरंपरेपासून कीर्तनसंस्कृतीपर्यंत, लोककथांपासून ऐतिहासिक चरित्रांपर्यंत, नाटकांपासून विज्ञान–तंत्रज्ञानापर्यंत मराठी साहित्याने विविध अंगांनी समृद्धी मिळवली आहे. लोकमान्य टिळक यांच्या अग्रलेखांनी स्वातंत्र्यलढ्याला धार दिली, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी मराठी साहित्याला नवचैतन्य दिले, तर पु.ल.देशपांडे यांनी आपल्या मिश्कील लेखणीतून मराठीला वेगळीच उंची दिली. वि.स.खांडेकर, रणजीत देसाई, शिवाजी सावंत यांच्या साहित्याने इतिहास आणि समकालीन समाजजीवनाचे दर्शन घडवले. आज, मराठी साहित्य नवनव्या वाटा शोधत आहे. किंडलवर पोहोचत आहे, पॉडकास्टच्या माध्यमातून ऐकले जात आहे, आणि सोशल मीडियावर चर्चिला जात आहे ही बाब उल्लेखनीय आहे.

भविष्यातील वाटचाल–मराठी भाषा आणि तिचे जतन मराठी भाषा ही केवळ भूतकाळाचा गौरव नसून, भविष्याची शिदोरी आहे. डिजिटल क्रांतीच्या युगातही मराठी साहित्य नवनवीन प्रयोगांमधून पुढे जात आहे. ब्लॉग, पॉडकास्ट, ऑडिओबुक्स, वेब सिरीज या सर्व माध्यमांतून मराठी भाषा नव्या पिढींपर्यंत पोहोचत आहे. ९८ वे साहित्य संमेलन हे केवळ एक सोहळा नाही, तर मराठीच्या उज्ज्वल भविष्यासाठी घेतलेली प्रतिज्ञा आहे. आपण सर्वांनी मिळून ही भाषा जपली पाहिजे, तिचा सन्मान केला पाहिजे, आणि तिच्या वृद्धीसाठी योगदान दिले पाहिजे. चला तर मग, माय मराठीच्या श्रीमंतीचा आणि साहित्याच्या भव्यतेचा हा सोहळा साजरा करूया!

**वर्षा फडके–आंधळे**

# जागतिकीकरण आणि अभिजात मराठी भाषा:एक आकलन

केंद्र सरकारने नुकताच मराठी भाषेला “अभिजात’ भाषेचा दर्जा दिला आहे. या पार्श्वभुमीवर २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. देशाच्या राजधानीत होणारा मराठी भाषेचा जागर केवळ महाराष्ट्रापुरता आणि देशापुरता मर्यादीत न राहता जगाच्या कानाकोप–यात राहणा–या तमाम मराठी बांधवांसाठी एक अविस्मरणीय क्षण राहणार आहे.

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

सन १९९३–१९९५ दरम्यान मी रामटेक (जि.नागपूर) येथे तालुका सहकार निबंधक पदावर कार्यरत असताना तेथील मराठीचे प्राध्यापक सुप्रसिद्ध कवी, समीक्षक व विचारवंत श्री.कृष्णा चौधरी यांच्याशी मैत्री जुळली. त्यावेळी मला सुद्धा मराठी साहित्यात, विशेषतः कविता क्षेत्रात थोडीशी रुची असल्याने, आम्ही (मी, प्रा.कृष्णा चौधरी आणि त्यांचे तत्कालीन दोन विद्यार्थी आजचे मराठीचे प्रा.डॉ.गिरीश सपटे व लोकप्रशासन विषयाचे प्रा.डॉ.जितेंद्र वासनिक) रामटेक येथे साहित्य विषयक कार्यक्रम घेत असायचो. अशाच एका कविसंमेलन प्रसंगी कृष्णा चौधरी यांनी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना पाचारण केले होते. त्यावेळी जोशी यांनी सादर केलेली कविता मला जशीच्या तशी आठवत नसली तरी ती चिमणी–संबंधित एक अतिशय उच्च दर्जाची कविता होती. त्या दिवसापासून मी डॉ.श्रीपाद जोशी यांच्या कवितेचा व लिखाणाचा फॅनच झालो. आपल्याला सुद्धा जोशी यांच्या कवितेसारखी कविता लिहिता यावी, असे वाटायचे. काही नकला सुद्धा मी केल्या असाव्यात. याच कालावधीत आजच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर–पाटणकर या नुकत्याच आय.ए.एस. होऊन रामटेक येथे बी.डी.ओ. म्हणून परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत होत्या. त्यांना सुद्धा आम्ही मराठी भाषा विषयक एका परिसंवादात पाचारण केले असता त्यांनी मराठीच्या भूतकाल, वर्तमान व भवितव्याविषयी अतिशय सुंदर असे सुबोध विश्लेषण केले होते. असा माझा मराठीविषयक प्रवास सुरू होता.

त्यानंतरच्या माझ्या उग्र वाचन–प्रवासात असेही कळले की, मराठी भाषेचे संवाद, संप्रेषण या आधुनिकतम विषयात सुद्धा भाषाशास्त्रीय संशोधन झाले असून त्याबद्दल श्री जोशी यांचा विशेष अभ्यास आहे. मला सुद्धा अशा अडनिड्या विषयाची आवड व अल्पशी समज असल्याने मी त्यासंदर्भात आणखी माहिती मिळवत राहिलो. पण मी एक तालुकास्तरीय शासकीय अधिकारी असल्याने, माझ्या प्रशासनिक व न्यायिकवत कामकाजाच्या धबडग्यात, माझ्या अशा या प्रयत्नांना स्वाभाविक मर्यादा होत्या व आहेत.

या संदर्भातील माझ्या मराठीविषयक प्रवासातील एक प्रसंग असा की, १९७८–१९८४ दरम्यान मी देवरी येथे जिल्हा परिषदेच्या कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक असताना शाळेला भेट देऊन आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषद भंडारा चे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनिलकुमार लखीना (IAS) आले होते. आम्हा शिक्षकांच्या औपचारिक सभेत त्यांनी सर्वांचा परिचय जाणून घेतला. माझ्या हातात त्यावेळेस PHONETICS वरील एक इंग्रजी पुस्तक होते. ते पाहून त्यांनी मला त्या पुस्तकाबद्दल काही प्रश्न विचारले. मला त्यातील काही प्रश्नांची योग्य, समाधानकारक उत्तरे देता आली नव्हती. माझी थोडीशी त–त–फ–फच झाली होती. तरी त्यावर अजिबात नाराज न होता, त्यांनी मला त्याविषयावरील आणखी काही पुस्तकांची नावे सूचवून ती पुस्तके सुद्धा वाचायला सांगितले होते. अशाप्रकारे माझी या प्रसंगाच्या माध्यमातून मराठी भाषा, तिचे उच्चारशास्त्र, संवाद आणि संप्रेषण विषयक प्रारंभिक माहितीशी ओळख होत गेली. ती अल्पस्वल्प ओळख मला माझ्या मराठी भाषेचे विविधांगी सौंदर्य तथा मराठीचे उपयोजनाबद्दल जाणून घेण्यास साह्यभूतच ठरली. वस्तूतः मला या विषयातले विशेष ज्ञान नसले तरी माझ्या डङ.इ., क.ऊउ.च. आणि ऊइ.च. च्या अभ्यासात या विषयाच्या प्रारंभिक ओळखीची मला शब्द संकल्पनेच्या यथार्थ अर्थनिर्णयनासाठी मदतच झाली.

पुढे मी महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागात राजपत्रित अधिकारी म्हणून (१९८४ मध्ये) रूजू झाल्यावर सहकार क्षेत्र व या क्षेत्रातील संबंधितांचा मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक ही विहित भूमिका पार पाडताना मला माझ्या या मराठी भाषेच्या अशा विविधांगी अर्थनिर्णयनाची व तद्जनित उपयोजनाची समज वृद्धिंगत होत गेली. आणि अर्थातच मराठी भाषाविषयक विविधांगी उपयोजनाबद्दलच्या माझ्या अशा अल्पस्वल्प ओळखीमुळे मला माझे न्यायिकवत (QUASIJUDICIAL) निर्णय व आदेश मराठीत लिहिताना खूप खूप मदतही झाली. मी विधीशास्त्राचा स्नातक (एल.एल.बी.) असून, वस्तूतः भारतातील बहुतेक कायदेकानून इंग्रजीतच असल्याने व कायदा पुस्तकातील इंग्रजी रचनाच अधिकृत व विधीमान्य मानण्याचे कायदेशीर बंधन असल्याने मराठी भाषेत न्यायिकवत (QUASI-JUDICIAL) निर्णय लिहिणे, सुस्पष्ट व निश्चित अर्थनिर्णयाच्या दृष्टीने मला प्रारंभी कठीणच ठरत असे. पण माझी ही मराठीची भाषिक संवाद व संप्रेषण विषयक शास्त्राची अल्पस्वल्प प्रारंभिक ओळख नेहमी माझ्या मदतीला धावून यायची. त्याचा सुपरिणाम असाही झाला की, माझे काही निर्णय मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात सुद्धा आव्हानित झाले असता ते कायम राहू शकले. याचा एक औपचारिक फायदा असा झाला की, मराठी भाषा ही माझ्या निवृत्तीनंतरच्या माझ्या सध्याच्या विधीव्यवसायात आर्थिक दृष्ट्या सुद्धा मदतीची ठरत आहे.

तसेच माझ्या या मराठी भाषेच्या विविधांगी स्वरुपाच्या अल्पस्वल्प ओळखीची मदत मला माझ्या कविता लेखनातच नव्हे तर इतर लेखनातही झाली, हे मी नाकारू शकत नाही. माझे यदा–कदा अभ्यास विषय असलेले तत्त्वज्ञान, राजनीती शास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, पुरातत्व, व्यवस्थापन व प्रशासन शास्त्र, सभाशास्त्र, विधीशास्त्र, सहकारी प्रबंधन, बँकिंग व अंकेक्षण, वाणिज्य, भौतिकशास्त्र, गणितशास्त्र, रसायनशास्त्र, अध्यात्म, दैवतशास्त्र, ज्योतिषशास्त्र, स्वभावशास्त्र, मंत्रशास्त्र, आयुर्वेद, योगशास्त्र, नॅचरोपॅथी, पुष्पौषधीशास्त्र, मानसशास्त्र सारखे विज्ञान–संमत/असंमत विविध विषय मला त्यांच्या त्यांच्या “व्यवहारा”ची भाषा, शब्द व शब्दार्थ सुद्धा शिकवून गेले.(मी एक मूर्ख : संदर्भ–दासबोध) आणि त्यामुळेच मला मराठी भाषा, मराठी भाषेतील शब्द व त्यांचा उच्चार, शब्दांचा बदलता अर्थ, त्यानुसारची संवाद व संप्रेषण प्रक्रिया, अशा प्रक्रियेतील जागतिकीकरणाचे सकारात्मक/नकारात्मक प्रभाव, मराठी एक अर्थार्जनाची साधन–भाषा... सारख्या संकल्पना हळूहळू थोड्याबहुत प्रमाणात कळू लागल्या.

आजच्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात वर नमूद डॉ.श्रीपाद जोशी म्हणतात त्याप्रमाणे ... मोठ्या प्रमाणावर माहितीचा, संवादाचा, भाषेच्या वापराचा लोकव्यवहार वाढल्याने संवाद–यंत्रांची, डेटाची मागणी वाढली, डेटा विकण्याचाच मोठा उद्योग आकाराला आला. हा उद्योग जगातील विविध भाषांमधून भाषेच्या व त्याला पूरक बहुमाध्यमी चिन्हांच्या वापरामुळे वाढला. पर्यायाने भाषिक व्यवहार, भाषांचा वापर वाढला. अर्थात तो तसा वाढावा यासाठीच जागतिकीकरणातून बाजाराचे, नवनवे बाजार शोधणे जे चालवले त्याचीच ती परिणती होती. भाषा या देखील त्यामुळे विक्रय वस्तु झाल्या, लेखन रुपात आणि आता तर ध्वनिरुपातही भाषेच्या वापराचा हा बाजार विस्तारतो आहे. हा भाषेच्या वापराचा बाजार साहित्य क्षेत्रात सुद्धा फोफावत असून साहित्यिकांच्या पुढे त्यांच्या समयसापेक्ष अभिव्यक्तीसाठी भलेमोठे प्रश्नचिन्ह सुद्धा या भाषीय–व्यापाराने उभे केले आहे. या प्रश्नचिन्हाला यशस्वीपणे सामोरे जाऊन साहित्यिकाने स्वतःच बदलाचे माध्यम होण्याची तयारी ठेवावी लागेल. डॉ.जोशी पुढे असेही म्हणतात की, “...या अगोदर माणसाचे भाषासंचित एवढ्या वेगाने कधीच बाधित झाले नव्हते. कोणत्याही बदलाचे माध्यम भाषा हेच असल्याने सर्वाधिक प्रभावित प्रथम होते ती भाषा, पर्यायाने संस्कृती. तसे झाले. ....” याद्वारे आजची भाषा–व्यवस्था डॉ.जोशी अगदी योग्य प्रकारे व्याख्यायित करतात, असे मला वाटते.

अशा या जागतिकीकरणाच्या प्रभावाने प्रभावित होत असलेली मराठी भाषा आता अभिजात भाषा म्हणून अधिकृतरित्या अधिघोषित झाल्याने तिच्या शास्त्रोक्त उच्चारापासून ते अ–भ्रामक/मूलार्थ (?) शब्दार्थापर्यंत ती कशी टिकवून ठेवावी हा सुद्धा महत्त्वाचा प्रश्न ठरत असून या प्रश्नाचे सयुक्तिक उत्तर शोधण्याची जबाबदारी आपसुकच साहित्यिकांवर व या विषयातील अभ्यासकांवर येते, असेही माझे अल्पबुद्धीचे आकलन आहे.

डॉ.जोशी यांच्या या संक्षिप्त पण ङ्गगागर में सागरफ असलेल्या लेखांशाने माझ्या विचारात जी चलबिचल निर्माण केली ती मलाच नव्हे तर अभिजात मराठी भाषेच्या प्रत्येकच चाहत्याला व अभ्यासकाला साह्यभूतच ठरणार आहे. त्यासाठी मी डॉ.जोशी यांचा आभारी आहे व असेन.

एकंदरीत माझ्या अशा या आडमुठ्या प्रवासात श्री. अनिलकुमार लखीना व डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या, कळत नकळत प्रेरणेचा, कळत नकळत प्रभाव (?), असला/नसला व मला ते मान्य असले/नसले तरी मी या दोघांचा शिष्य मात्र नाही/होऊ शकलो नाही/होऊ शकत नाही. मला गुरु–शिष्य ही संकल्पनाच मान्य(!) नसल्याने तसा प्रश्नच उद्भवत नाही. आणि कदाचित त्यामुळेच मी अनिलकुमार लखीना यांच्या जगप्रसिद्ध(!) रेर्काड किपींग संकल्पनेवर तथा श्रीपाद जोशी यांच्या काही विचारांवर माझे मतभेद व्यक्त करण्याचे धाडस करू शकलो/शकतो. यापैकी अनिलकुमार लखीना यांच्याशी पुन्हा कधी, आजवर तरी संबंध आला नाही, संपर्क सुद्धा झाला नाही. त्यामुळे त्यांच्या माझ्यावरील राजी–नाराजीचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु श्रीपाद जोशी यांच्याशी अजूनही प्रत्यक्षाप्रत्यक्ष संपर्क सुरू असून त्यांच्या या विषयातील विचार–प्रतिपादनाचा मला आधार घेताना संकोच वाटत नाही.

आमचे मित्र दिवंगत डॉ.अनिल नितनवरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ डिजिटल अ/नियतकालिक तत्रैव – २ अंकात प्रकाशित डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या “जागतिकीकरण आणि भाषा” या गागर में सागर स्वरूपाच्या महत्त्वपूर्ण लेखाच्या निमित्ताने मला मराठी या अभिजात भाषेच्या संदर्भात अशाप्रकारे प्रकट होता आले, त्याबद्दल मी डॉ.जोशी आणि तत्रैव च्या सर्व चमू–मंडळींचा आभारी आहे. खूप खूप धन्यवाद आणि पुनश्च आभार!



**ॲड.लखनसिंह कटरे,**
**बोरकन्हार–४४१९०२,**
**जि.गोंदिया,(विदर्भ–महाराष्ट्र)**

# जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी २०० कोटीची तरतूद करा

**अर्जुनी–मोर.** –निसर्गाची भरभरून देन असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव –नागझिरा– प्रतापगड इटियाडो, चुलबंद, मांडोदेवी, कचारगड हे ऐतिहासिक धार्मिक व पर्यटन स्थळ असून या स्थळांना एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यात समाविष्ट करून या स्थळांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसंकल्पात २०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून व निवेदन देऊन केली आहे. याच आशयाचे निवेदन त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांनाही दिले आहे.

गोंदिया जिल्हा हा निसर्ग संपत्तीने व वनाने आच्छादलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात उद्योगधंदे यांना वाव नाही. अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी या दोन्ही तालुक्यातील मोठा क्षेत्र वनाने व्यापलेला असून पर्यावरण संवेदनातील क्षेत्र पी एस झेड आहे. त्यामुळे मनुष्य आणि प्राणी यांच्यात वारंवार संघर्ष निर्माण होतो. शेतीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होते. युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होत नाही. म्हणून या ठिकाणी एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. नवेगाव बांध नागझिरा इटियाडोह प्रतापगड चुलबंद मांडोदेवी कचारगड या स्थळांचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर करावा व त्यात खालील बाबी समाविष्ट करण्यात याव्यात व त्यासाठी किमान २०० कोटी निधी सन २०२५ – २६ च्या बजेट मध्ये मंजूर करावे अशी मागणी आमदार राजकुमार बडोले यांनी केली आहे.

# १९ वे विद्रोही साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ.अशोक राणा यांचा सत्कार



**नागपूरः–** संभाजीनगर (औरंगाबाद) येथे आयोजित यंदाच्या १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी डॉ. अशोक राणा यांची निवड झाली असून, संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या संमेलनपूर्व सत्कार पर्वास नागपूर येथून मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.

दि. २१,२२ व २३ फरवरी ला विद्रोही मराठी साहित्य संमेलन, आम खास मैदान, औरंगाबाद येथे भव्य स्वरुपात आयोजित केले असून, विद्रोही परंपरेनुसार निवड करण्यात आलेल्या अध्यक्षांचा सत्कार अनेक ठिकाणी केला जातो, नागपूर येथे दि. ११ फेब्रुवारीला सेवादल महाविद्यालय सभागृहात मा. चंद्रकांत वानखडे, माजी अध्यक्ष १७ वे विद्रोही म. सा. सं. वर्धा, यांचे हस्ते, सेवादल शिक्षण संस्था अध्यक्ष संजय शेंडे, डॉ. अशोक चोपडे, सत्यशोधक साहित्यिक, वर्धा, संध्या राजूरकर, संपादक दैनिक बहुजन सौरभ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी मान्यवरांनी विद्रोही साहित्य संमेलनाच्या आयोजनामागील भूमिका, विद्रोही साहित्य प्रवाहाची अपरिहार्यता, विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य आणि १९ विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. अशोक राणा यांची निवड झाल्याबद्दल गौरवण्यात आले. डॉ अशोक राणा याप्रसंगी संबोधन करताना, संमेलनाचे अध्यक्ष पद प्राप्त झाल्यानंतर जबाबदारी अधिक दृढ झाल्याची संमती दर्शवली, आणि महात्मा फुले यांनी मराठी ग्रंथकार सभेला धाडलेल्या पत्रातील सज्जड इशाऱ्याबर हुकूम येणारा काळच विद्रोहीचा असणार आहे, असा विश्वास व्यक्त केला. विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र आणि विद्रोही मराठी साहित्य संमेलन विद्रोही विचाराची लढाई आता यापुढे शेतकरी, कष्टकरी, ओबीसी, दलित, आदिवासी, विमुक्तभटके, धार्मिक अल्पसंख्याक आणि स्त्री शक्ती यांच्या एकजुटीने निकराची होऊ लागली आहे. विद्रोहीचा प्रवाह हाच या देशातील बहुसंख्येने असलेल्या स्त्रीशुद्रातिशुद्रांचे प्रतिनिधित्व करत असल्याने हाच निर्विवादपणे मुख्य प्रवाह ठरला आहे. संभाजीनगर येथे आयोजित विद्रोही मराठी साहित्य संमेलनात आपले मनापासून स्वागत असून मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून या साहित्य संमेलनाचा भाग बनून विद्रोही प्रवाह सशक्त करावा.असे आव्हानही केले.

प्रस्तुत जाहीर सत्कार आयोजनाची भूमिका बाबा बिडकर यांनी प्रास्ताविकातून विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुज हुलके यांनी तर आभार प्रदर्शन वंदना वनकर यांनी केले. याप्रसंगी विद्रोही मराठी साहित्य संमेलन आयोजन समिती विजय बाभूळकर, संजय नरखेडकर, टेमराज माले, संजय मांगे, ज्ञानेश्वर रक्षक, शरद वानखडे, नरेंद्र सहस्त्रबुद्धे,आशू सक्सेना, प्रमोद कावळे, राजू बोचरे, इंद्रपाल जौंजाळकर, उमेश कोरराम, प्रदीप शेंडे, मीरा मदनकर, जयंत झंझाड, राजेंद्र डफ , सुधाताई बामनपल्लीवार, होमेश भुजाडे, मदन नागपूरे, डॉ गणेश चव्हाण, प्रकाश दुलेवाले, दुर्गाबाई बाभूळकर, दिगांबर जिचकार, राजू कळसाईत, कपिल थुटे वर्धा, आणि विविध सामाजिक संघटना, साहित्यिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी वर्धा येथील विद्रोही टीमने देखील अध्यक्षांचा सत्कार केला. मराठा सेवा संघ यांनी देखील यावेळी सत्कार केला.

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन एक अपूर्व योग

आपल्या मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला आणि याच पार्श्वभूमीवर, मायमराठीचा जागर करण्यासाठी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत संपन्न होत आहे. प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानास्पद अशी ही बाब मानावी लागेल.

दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझाः ही केवळ कविकल्पना नाही तर आपल्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय आहे, याचा प्रत्यय आपणास या ऐतिहासिक संमेलनातून येणार आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्रभावना, मानवता आणि एकात्मता यांचा आगळा मिलाफ यानिमित्ताने महाराष्ट्र वा देशातीलच नव्हे, अवघ्या जगातील साहित्यरसिक देशाच्या राजधानीत अनुभवणार आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन यसरहद, पुणेयच्या पुढाकारातून याच भावनेतून आयोजित करण्यात आले आहे. हे संमेलन व त्याच्याशी निगडित सर्व घडामोडी, माहिती आणि संवादासाठी हे संकेतस्थळ आपल्या सेवेत सादर आहे. या माध्यमातून आपणही या ऐतिहासिक साहित्यक्षणांचे साक्षीदार होता येईल.

भारताची राजधानी दिल्ली–जिथे विविध भाषा, संस्कृती आणि परंपरा एकत्र येतात. या बहुरंगी वातावरणात महाराष्ट्राची ओळख जपणाऱ्या आणि मायमराठीचा जागर घालणाऱ्या मराठी बांधवांची संख्या मोठी आहे. दिल्लीतील मराठी मंडळी केवळ आपली भाषा आणि संस्कृती टिकवून ठेवत नाहीत, तर ती मोठ्या उत्साहाने साजरीही करतात.

**दिल्लीतील मराठी संस्कृतीचे अस्तित्व :**

दिल्ली ही जरी मुख्यतः हिंदी भाषिकांचा गड असला, तरी इथे मराठी भाषिकांचे योगदान मोठे आहे. शिक्षण, प्रशासन, कला, साहित्य आणि उद्योगधंद्यांमध्ये मराठी माणसांनी आपली वेगळी छाप सोडली आहे. विविध मराठी संस्था, मंडळे आणि संघटना दिल्लीतील मराठी संस्कृतीला एकत्र बांधून ठेवण्याचे कार्य करतात.

मराठी माणूस आपल्या सण–उत्सवांना आणि परंपरांना पाळण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. गणेशोत्सव, शिवजयंती, गुढीपाडवा, नवरात्रोत्सव यांसारखे मोठे सण येथे उत्साहाने साजरे होतात. मराठी नाट्यसंस्कृतीही येथे चांगलीच रुजली आहे. वेळोवेळी होणाऱ्या नाट्यस्पर्धा, कविसंमेलने, संगीत संध्या यामुळे मराठी रसिकांना एकत्र येण्याची संधी मिळते.

विविध साहित्य संमेलने, ग्रंथ प्रदर्शनं आणि कवी संमेलनांमध्ये मराठी साहित्याचा स्वतंत्र ठसा उमटतो. महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, कवी आणि विचारवंत दिल्लीच्या व्यासपीठावर आपली भूमिका मांडतात. साहित्य अकादमी आणि अन्य राष्ट्रीय संस्थांमध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

राजकीय, प्रशासकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातही मराठी माणसांची मोठी संख्या आहे. संरक्षण क्षेत्र, नागरी सेवा, शिक्षण, संशोधन आणि पत्रकारिता या क्षेत्रांमध्ये मराठी मंडळींनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**“दिल्लीतील महाराष्ट्र”– पुढील वाटचाल**

आजच्या काळात डिजिटल माध्यमांमुळे दिल्लीतील मराठी लोक अधिक जवळ येत आहेत. ऑनलाइन मराठी गट, वेबिनार, वाचन कट्टे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या बाहेर राहूनही मायमराठीचा जागर सुरू आहे. भविष्यात अधिक व्यापक प्रमाणावर मराठी भाषा आणि संस्कृतीचा प्रचार करण्यासाठी पुढाकार घेतला जाईल.

दिल्ली ही फक्त देशाची राजधानी नाही, तर ती विविधतेतील एकतेचं उत्तम उदाहरण आहे. इथे राहणारा प्रत्येक मराठी माणूस आपल्या भाषेचा आणि संस्कृतीचा अभिमान बाळगतो. दिल्लीतही मायमराठीचा जागर अविरत सुरू राहणार आहे !

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

साहित्यिक परंपरेचा अभिमानस्पद वारसा :महाराष्ट्रातील वाशिम जिल्हा केवळ ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा नाही, तर त्याची एक समृद्ध साहित्यिक परंपराही आहे. संतसाहित्यापासून आधुनिक साहित्यप्रवाहांपर्यंत वाशिमने अनेक साहित्यिक घडवले आहेत.

**संतसाहित्य आणि वाशिमचा वारसा**

वाशिम जिल्ह्याचा संतसाहित्याशी फार जवळचा संबंध आहे. संत वामनभाऊ, संत चोखामेळा आणि संत नामदेव यांचे विचार या भागात रुजलेले आहेत. संतपरंपरेतील भक्तिसाहित्य आणि अभंगांनी इथल्या लोकजीवनावर मोठा प्रभाव टाकला आहे.

**साहित्य संमेलने आणि वाशिमचा सहभाग**

वाशिम जिल्ह्यात मराठी साहित्य संमेलनांसाठी विशेष ओळख आहे.स्थानिक पातळीवर वाचन कट्टे, काव्यगोष्टी आणि साहित्य चर्चा नियमितपणे होतात. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर साहित्यिक उपक्रमांना मोठा प्रतिसाद मिळतो.

**साहित्य आणि सामाजिक चळवळींची सांगड**

वाशिममध्ये साहित्य हे केवळ करमणुकीचे साधन नाही, तर सामाजिक चळवळींसाठी प्रभावी माध्यम ठरले आहे. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि स्त्रीवादी लेखन यांना वाशिम जिल्ह्यातून मोठा पाठिंबा मिळतो.

**वाशिमचा साहित्यिक प्रवाह: नव्या पिढीची जबाबदारी :**

आजच्या डिजिटल युगात वाशिम जिल्ह्यातील साहित्यिक परंपरा ब्लॉगिंग, सोशल मीडिया, ई–पुस्तकं आणि पॉडकास्टिंगच्या माध्यमातून पुढे नेत नव्या पिढीला प्रेरित करत आहे.

**आधुनिक साहित्यविश्वातील वाशिमचा ठसा :**

वाशिमच्या मातीतून अनेक नामवंत साहित्यिक, कवी आणि लेखक निर्माण झाले. त्यापैकी बाबाराव मुसळे: वाशिम जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे हे मराठी साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे लेखक आहेत. त्यांनी विविध साहित्य प्रकारांमध्ये लेखन केले आहे.

डॉ. विजय जाधव: वाशिम येथील डॉ. विजय जाधव यांचा मगोरवेणाफ हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या या साहित्यकृतीला राज्यस्तरीय ग्रंथ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

प्रा. लता जावळे: प्रा. लता जावळे यांनी मराठी साहित्य निर्मितीमध्ये महिला साहित्यिकांचे योगदान या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी वाशिम जिल्ह्यातील विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे.

**पद्मश्री नामदेव कांबळे:**

नामदेव कांबळे हे मराठी साहित्यिक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते होते. ते विशेषतः दलित साहित्याच्या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणारे लेखक म्हणून ओळखले जातात.

प्रा. मोहन शिरसाट हे १९८६ पासून वाशिम येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या विद्यालयीन जीवनात प्रथम विठ्ठल वाघ यांच्या तोंडून व?हाडी भाषेतील कविता ऐकून, त्यांना वाचन आणि लेखनाची आवड निर्माण झाली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, त्यांनी सामाजिक कार्यात सहभाग घेतला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दृष्टीने वाशिम जिल्ह्याचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वारसा महत्त्वाचा ठरतो. वाशिम जिल्ह्यात मराठी साहित्याची समृद्ध परंपरा असून, अनेक लेखक, कवी, विचारवंत आणि साहित्यिक चळवळी येथे घडल्या आहेत.

**वाशिम जिल्ह्याची साहित्य संमेलनाच्या संदर्भात विशेष वैशिष्ट्ये:**

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा :वाशिम हे पूर्वी वत्सगुल्म म्हणून ओळखले जात असे आणि हे वाकाटक राजवंशाच्या राजधानीचे ठिकाण होते.येथे अनेक ऐतिहासिक मंदिरे आणि संस्कृतीला चालना देणारे ठिकाणे आहेत.संत नामदेव, संत तुकाराम यांचा प्रभाव असलेल्या या भागात वारकरी संप्रदायाचे महत्त्व आहे.

**साहित्यिक परंपरा आणि योगदान :**

वाशिम जिल्ह्यात अनेक साहित्यिक कार्यरत आहेत. बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे यांसारखे लेखक आहेत त्यांच्या दलित साहित्य, ग्रामीण साहित्य आणि सामाजिक परिवर्तनवादी साहित्याची येथे विशेष परंपरा आहे.

साहित्य संमेलनासाठी अनुकूल वातावरण :वाशिममध्ये साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद मिळतो.येथे साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात, त्यामुळे संमेलनाचे आयोजन अधिक प्रभावी ठरू शकते. शैक्षणिक संस्था, ग्रंथालये आणि स्थानिक साहित्य मंडळे यांचा सक्रीय सहभाग राहतो. वाशिमसारख्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वारसा असलेल्या जिल्ह्यात नव्या साहित्यिकांना या संमेलनाच्या माध्यमातून नवा दिशा आणि प्रेरणा मिळू शकते.

वाशिम जिल्ह्याने संतपरंपरेपासून ते आधुनिक साहित्यापर्यंत आपली वेगळी छाप सोडली आहे. येथे साहित्यिक वारसा समृद्ध असून तो पुढे नेण्याची जबाबदारी नव्या पिढीवर आहे. वाशिमचा हा उज्ज्वल साहित्यिक वारसा असाच फुलत राहो हीच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर सदिच्छा व्यक्त करतो.

**मयासेरोद्दीन काझी**
जिल्हा माहिती अधिकारी वाशिम.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# कचारगडच्या विकासासाठी शासन कटिबध्द-आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके



**गोंदिया :-** कचारगड हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. देशाच्या अनेक राज्यातून दरवर्षी या ठिकाणी भाविक येथे येत असतात. येथे येणाऱ्या भाविकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे कचारगडचा विशेष विकास आराखडा तयार करण्यात यावा. कचारगडच्या विकासासाठी शासन कटिबध्द आहे, अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी दिली.

राष्ट्रीय स्तरावरचा गोंडी समाजाचा सांस्कृतिक उत्सव, महाअधिवेशन तथा कोया पुनेम निमीत्त सालेकसा तालुक्यातील धनेगाव येथील कचारगड येथे १० फेब्रुवारीपासून पारी कोपार लिंगो माँ काली कंकाली पेनठाना देवस्थान कचारगड यात्रा सुरु झाली असून येथील सांस्कृतिक भवन येथे (ता.१२) आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

केंद्रीय आदिवासी व्यवहार राज्यमंत्री दुर्गादास उईके, माजी केंद्रीय मंत्री फगनसिंह कुलस्ते, खासदार सर्वश्री डॉ.नामदेव किरसान, भोजराज नाग, महेंद्र कश्यप, आमदार सर्वश्री संजय पुराम, डॉ.परिणय फुके, रामदास मसराम, नामदेव उसेंडी, माजी खासदार अशोक नेते, माजी शिक्षणमंत्री वसंत पुरके, माजी आमदार भैरसिंह नागपुरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कचारगड यात्रेची परंपरा खुप मोठी आहे. या ठिकाणी आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात येतात. मी महाराष्ट्राचा आदिवासी विकास मंत्री आहे, मला या ठिकाणी येऊन आशिर्वाद व दर्शनाचा लाभ घेता आला. या ठिकाणी मिळालेली आशिर्वादरुपी ऊर्जा आदिवासी बांधवांच्या विकासासाठी प्रेरणा देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जल, जमीन आणि जंगलाचे संवर्धन आदिवासी समाजाने केले आहे. या समाजाच्या प्राचिन अशा संस्कृतीचे जतन करण्याचा शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. देशातील विविधता, सामाजिक समृध्दी आणि एकात्मता टिकून राहण्यासाठी संस्कृतीचे जतन होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजातील सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरेचे संवर्धन करण्यावर भर देणार आहे. सरकार गोंडी आदिवासी समाजाच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून गोंडी संस्कृतीचे निश्चितच जतन करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

आदिवासी सर्व पात्र विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळेल. स्थानिकांची गरज लक्षात घेऊन आदिवासी बांधवांच्या हा-ताला काम देण्यात येईल. वन हक्क जमीन पट्ट्यांपासून आदिवासी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. शासकीय वसतिगृह, आश्रम शाळांमध्ये सर्व आवश्यक सोयी-सुविधा निर्माण करण्यात येईल. प्रत्येक आदिवासी महिलेला सन्मानपूर्वक वागणूक दिल्या जाईल. आदिवासींच्या समस्या सोडविण्यावर भर देणार असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. कचारगडचा दर तीन महिन्यांनी आढावा घेणार असेही त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री दुर्गादास उईके म्हणाले, कचारगड हे एक पवित्र स्थळ असून येथे आल्यावर व्यक्तीमध्ये चेतना जागृत होतात. ज्या भागात समाज एकजुट राह-तो तिथे विकासाच्या नविन दिशा निर्माण होतात. या समाजातील लोकांना कितीही भाषा बोलता येत असल्या तरी गोंडी बोलीभाषा आदिवासी समाजातील बांधवांना बोलता आली पाहिजे. कारण गोंडी भाषा ही गोंडवाना समाजाचा गौरवशाली वैभव आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार रामदास मसराम, माजी केंद्रीय मंत्री फगनसिंह कुलस्ते, खासदार भोजराज नाग, आमदार संजय पुराम, माजी खासदार अशोक नेते यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आदिवासी बांधवांच्या परिवारासाठी आरोग्याचा उपचार व्हावा यासाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, मोतियाबिंदू, किडनीचे व पोटाचे आजार, मेंदूचे आजार व इतर दुर्धर आजारांवर मोफत तप-ासणी, औषधोपचार व प्रयोगशाळा तपासण्या करण्यात आल्या असून त्याचा लाभ बहुसंख्य भाविकांनी यावेळी घेतला.

कार्यक्रमास जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, जि.प.समाज कल्याण सभापती रजनी नागपुरे, पंचायत समिती सभापती गोंदिया मुनेश्वर रहांगडाले, जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, प्रकल्प अधिकारी गोंदिया उमेश काशिद, प्रकल्प अधिकारी चंद्रपूर विकास राचेल-वार, उविभागीय अधिकारी देवरी कविता गायकवाड, तहसिलदार सालेकसा नरसय्या कोंडागुर्ले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, नगरपंचायत मुख्याधिकारी देवरी संजय उईके, सालेकसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील आत्राम यांचेसह आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कचारगड सेवा समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद कोकोडे यांनी केले. सुत्रसंचालन भरत मडावी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार आमदार संजय पुराम यांनी मानले.

# तिर्थक्षेत्र विकासासाठी शासन उदासीन : खा.डॉ.किरसान

## कचारगड येथे सप्तरंगी ध्वजाचे उद्घाटन



**गोंदिया :-** जिल्ह्यातील कचारगड येथे आदिवासी समाजाचे श्रध्दास्थान आहे. दरवर्षी या ठिकाणी भव्य यात्रा आयोजित केली जात आहे. शासनाचे मंत्री, अधिकारी या ठिकाणी भेटी देतात, मोठ्या घोषणा करतात. निधी उपलब्ध करून क्षेत्राचा कायापालट करणार, असेही अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. खुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी कचारगडचा विकास करणार, असे आश्वासन दिले होते. परंतु, आतापर्यंत या क्षेत्राचा विकास झा-लेला नाही. यामुळे केलेल्या घोषणा फोल ठरल्या, असे प्रतिपादन गडचिरोली-चिमुर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी केले.

कचारगड येथे सप्तरंगी ध्वज-ारोहण प्रसंगी ते बोलत होते. दरवर्षी सालेकसा तालुक्यातील कचारगड येथे भव्य यात्रेचे आयोजन करण्यात येते. याठिकाणी आदिवासींचे श्रध्दास्थान असल्याने देशभरातील आदिवासी बांधव या ठिकाणी भेट देतात. त्याचबरोबर केंद्रीय व राज्याचे मंत्रीही या ठिकाणी भेट देवून आदिवासी महोत्सवात सहभागी होतात. १२ फेब्रुवारी रोजी यात्रा ठिकाणी सप्तरंगी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी खा.डॉ.नामदेवराव किरसान यांच्यासह आदिवासी समाजातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. किरसान यांनी कचारगड क्षेत्राच्या विकासाला घेवून युती सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. सन २०१८ मध्ये तिर्थक्षेत्राचा विकास व्ह-ावा, यादृष्टीकोनातून १०० कोटीचा निधी उपलब्ध करून देणार, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली होती. परंतु, अद्यापही निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही. मागील कित्येक वर्षांपासून या क्षेत्राचा विकास करणार, असे फोल आश्वासन दिले जात आहे. परंतु, विकास करण्यात आलेला नाही. पर्यटन स्थळाचा दर्जा दिला पण अद्यापही पर्यटनाच्या दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारची ठोस पाऊल उचलण्यात आले नाही. यामुळे फक्त घोषणा पुरत्याच या ठिकाणचा विकास झाला, अशी टिका खासदार डॉ. किरसान यांनी केली.

# थेट मंत्रालयातून आणले जाते कामाचे कंत्राट

## लाखोचा निधी खर्च तरी गावाची अवस्था भकासच

**नवेगावबांध :-** गावात मुलभूत सोयीसुविधा देण्याच्या नावाखाली शासनाच्या २५/१५ योजनेंतर्गत कोणतेही काम घेता येत असल्याने एखाद्या कामाची गरज आहे किंवा नाही, याचा फारसा विचार न करता थेट मुंबई येथून ग्रामविकास मंत्रालयातून कामाचे कंत्राट परस्पर कंत्राटदारांकडून आणले जात आहेत. त्या कामाची गरज त्या गावाला आहे किंवा नाही याचे कुठलेही नियोजन, शहानिशा न करता लाखो रुपयांची कामे कंत्राटदार आणतात.

ही कामे बोगस पद्धतीने केली जातात. अशा पद्धतीने सरकारच्या लाखो रुपयांचा आर्थिक लाभ आपल्या पदरात कंत्राटदार पाडून घेत असल्याचे दिसत आहे. अशा प्रकारची कामे नवेगावबांध ग्राम पंचायतस्तरावर व अर्जुनी मोरगाव तालुक्यातही मोठ्या प्रमाणात झाल्याची माहिती आहे. त्यामुळे कोट्यवधींचा खर्च होऊनही गावे मात्र अजूनही भकासच दिसत आहे.

ग्रामविकास विभागाची २५/१५ योजना मलोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या ग्रामीण भागा-तील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणेफ या शीर्षकाखाली आहे. यामध्ये प्रत्येक नेत्यांचे कार्यकर्ते गावात कोणते काम करायचे, याचे निवेदन देऊन आमदारांचे पत्र घेतात. मग, हे पत्र ग्रामविकास मंत्र्यांकडे जाते. तेथून काम मंजूर झाल्यावर प्रशासकीय मान्यता दिली जाते. यामध्ये नेमक्या कामाचा उल्लेख नसतो. हे काम जिल्हा परिषदेने करायचे की सार्वजनिक बांधकाम विभागाने? हे आमदारांच्या मनावर असते. गावासाठी निधी मंजूर झाल्यानंतर तो कशावर खर्च करायचा, याचे नियोजन केले जाते. नेत्यांचे मलाडकेफ कंत्राटदारच हा सर्व निर्णय घेतात. मग काम कुणी घ्यायचे ठरविले जाते.

भूमिपूजन होते, उद्घाटनही होते, परंतु नेमके काम कुणी केले, कुठे केले? याकडेही पाहिले जात नाही गेल्या २० वर्षांतील अशा कामांची यादी काढली आहे. त्यामुळे सदर योजनेंतर्गत अनेक कामे कागदोपत्री झाली किंवा अर्धवट सोडून दिल्याचे दिसून येतात. यामागे फक्त काम मिळवून आर्थिक लाभकरून घेणे, हा एकमात्र उद्देश मात्र उद्देश असून गावाच्या विकासाशी काहीच देणे-घेणे नाही, असेच अनेक गावांत अर्धवट राहिलेल्या कामावरून दिसून येते.

### मुख्यमंत्र्यांनी टोचले कान

**गत महिन्यात संपन्न झालेल्या शिर्डी येथील भाजप अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामविकास विभागाच्या २५/१५ योजनेचा उल्लेख केला आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले की, ग्रामविकास विभागाच्या २५/१५ ही योजना कुणालाही 'रोजगार' देण्यासाठी नसून जनतेचे दुःख दूर करण्यासाठी आहे, याची जाणीव ठेवा, अशा सक्त सूचना त्यांनी उपस्थितांना दिल्या. या योजनेच्या आडून नेमका काय कारभार चालतो, हे मुख्यमंत्र्याच्या लक्षात आले आहे. अशा पद्धतीमुळे सरकारची किवा पक्षाची बदनामी होऊ नये, हा मुख्यमंत्र्यांचा त्यामागील उद्देश असावा.**

# एमपीएससी परीक्षेत तिरोड्याचा समर पारधी ओबीसी गटात राज्यात प्रथम



**गोंदिया- :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) च्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्य सेवा परी-क्षेचा निकाल जाहिर झाला आहे. या निकालात एमपीएससीच्या ग्रुप सी मधून गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा येथील समर उमाशंकर पारधी याने ओबीसी प्रवर्गातून राज्यात प्रथम तर सर्वसाधारण प्रवर्गातून व्दितीय क्रमांक पटकाविला आहे. समर पारधीच्या यशामुळे जिल्हाभरात त्याचे कौतुक केले जात आहे. तिरोडा येथील समर उमाशंकर पारधी याने महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) च्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्य सेवा परीक्षा दिली.त्याच्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

समीरचा मूळगाव इंदोरा खुर्द असून येथील प्राथमिक शाळेत शिक्षण घेतले.तिरोडा येथे १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर इंजिनीयर होण्याची इच्छा असल्यामुळे सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग इथून शिक्षण पूर्ण केले.नौकरी न करता लोकांसाठी आणि समाजासाठी काही करायचे या विचाराने स्पर्धा परिक्षेची तयारी करण्याचे ठरवले. आणि दिल्ली येथे जाऊन अभ्यासाची सुरवात केली, पण अपयश मिळाले. त्यानंतर तिरोडा येथे परत येत पुन्हा MPSC च्या तयारीला सुरुवात केली.२०२३ या वर्षीच्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (MPSC) कडून घेण्यात आलेल्या गट क परिक्षेचा निकाल नुकताच लागला. त्यात पूर्व, मुख्य, अशी परीक्षा उत्तीर्ण करीत सर्वसामान्य गटात महाराष्ट्र राज्यात द्वितीय आणि OBC मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

समरने सांगितल्यानुसार काही वर्षांत सतत ८ ते १० तासाचा अभ्यासा नंतर हे यश मिळाले आहे. या यशाचे निरंतर अभ्यास, कठीण परिश्रम व स्मार्ट कार्य आणि घरी राहून सुधा तंत्रज्ञानाच्या मदतीने यश गाठणे शक्य असल्याचा विश्वास व्यक्त केला.समीरने आपल्या यशाचे श्रेय आपल्या गुरुजन आई वडील भाऊ मित्र परिवार यांना दिले आहे.

# ओबीसी-एनटी विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम सुरू करण्याची मागणी



**भंडारा :-** राज्यभरासह भंडारा शहरातील ओबीसी-एनटी विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम तातडीने सुरू करण्याची कार्यवाही करावी व अन्य मागण्यांसाठी ओबीसी सेवा संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

अठरापगड जातींचा समूह असलेला ओबीसी समाज राज्यात अद्यापही प्रमुख सत्तेपासून कोसो दूर आहे. ओबीसींच्या अनेक समस्या आवासून उभ्या आहेत. जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जाणारा ओबीसी शेतकरी समाज आर्थिक व सामाजिक दृष्टीने मागास आहे. अद्यापही अनेक प्रलंबित समस्या शासनाच्या दरबारी खितपत पडल्या आ-हेत. या समस्यांची दखल घेतून ओबीसींच्या समस्या व अडचणी दूर करण्यात याव्या, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

### निवेदनातील प्रमुख मागण्या याप्रमाणे

ओबीसींची जातिनिहाय जनगणना करावी, न्यायप्रविष्ट युपीएससी पात्र ९८५ उमेदवारांना त्वरित नियुक्ती पत्र द्यावे. भंडारा शहरासह राज्यातील ओबीसी-एनटी विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम तातडीने सुरू करण्याची कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांसाठी आधार योजना कार्यान्वित करुन त्याचा प्रत्यक्ष लाभ देण्यात यावा. मराठ्यांचे ओबीसीकरण करण्यासाठी नेमलेल्या शिंदे समितीची मुदतवाढ थांबवावी. सन २०२९ पासून प्रलंबित असलेले प्रीमॅट्रीक शिष्यवृत्तीचे १२ कोटी रुपये भंडारा जिल्ह्याला अदा करण्यात यावे.

### शिष्टमंडळात यांचा होता पदाधिकाऱ्यांचा समावेश

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात ओबीसी सेवा संघाच्या पदाधिकारी मंगला वाडिभस्मे, ललिता देशमुख, ईश्वर निकुळे, जिल्हाध्यक्ष गोपाल सेलोकर, वसंत काटेखाये, राजेश देशमुख, तुळशीराम बोंदरे, श्रीकृष्ण पडोळे, रोशन उरकुडे, रमेश शहारे, अरुण जगनाडे, पंजाबराव कारेमोरे, वृंदा गायधने, माधुरी खंडाईत, वैशाली लांजेवार, लता बोरकर, भावना निकुडे, शुभदा झंझाड, स्मिता वैरागडे, तनिष्का नान्हे, जयश्री जगनाडे, अर्चना वैरागडे, प्रमिला डोरले आदी पदाधिकारी व इतर कार्यकर्त्यांचा समावेश होता.

# आ.रहांगडालेनी घेतला धापेवाडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत कामांचा आढावा



**तिरोडा:-** धापेवाडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत तिरोडा व गोंदिया तालुक्यातील ३०५५.५९ हेक्टर जमिनिमध्ये रबी धानपिक लावले गेले आहे.सदर क्षेत्राची वाढ होवून विधानसभा क्षेत्रातील जास्तीत जास्त शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळावा व शेवटच्या टोकापर्यंतच्या शेतक-याच्या शेतात पाणी जावे,याकरिता तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी धापेवाड उपसा सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यासोबत नुकताच आढावा घेतला.यात नहर दुरुस्तीकरिता २०० कोटी विशेष मंजूर निधीची कामे वेळेवर होण्याकरिता आमदार दर महिन्याला संबधित यंत्रणेसोबत आढावा बैठक घेत आहेत.

याव्यतिरिक्त उपसा सिंचन योजनेअंतर्गत येणारे सर्व नहराच्या दुरुस्तीचे नियोजन करून मंजुरीकरिता शासनाकडे पाठविण्याचे निर्देश आमदार रहागंडालेंनी दिले. यावेळी कार्यकारी अभियंता अंकुर कापसे, उपभियंता पंकज गेडाम, प्रणय नागदिवे, मुख्याधिकारी राहुल परिहार उपस्थित होते.






# ६ हजार सिंचन विहिरीचे काम ठप्पच !

## कसे होणार सिंचन : ६६७१ विहिरींना प्रशासकीय मान्यता,८७०६ शेतकऱ्यांचे प्रस्ताव, केवळ ८६७ विहिरींचे काम सुरू

**गोंदिया :-** जिल्ह्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत जिल्ह्याला ८ हजार २०५ विहिरींचे उद्दिष्ट असताना ६ हजार ६७१ विहिरींना प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रत्यक्षात ८६७विहिरींच्याच कामाला सुरुवात झाली आहे. अजूनपर्यंत एकही विहिरींचे काम पूर्ण झाले नाही. मोठ्या प्रमाणात कामे अपूर्ण असल्याने शेतीला सिंचन होणार कसे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

गोंदिया जिल्ह्यात ज्या भागात सिंचनाच्या सोयी पुरेशा नाहीत, अशा भागातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी तालुकानिहाय दोन हजार सिंचन विहिरींची कामे करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर मागेल त्याला विहीर देण्याच्या भूमिकेमुळे सिंचन विहिरींच्या मान्यतेचा आकडा ६ हजार ६७१ वर पोहोचला होता.

या विहिरींमुळे काही भागात शेतकऱ्यांना किमान रब्बीचे पीक घेण्याची तरी सोय होत आहे. तर काही शेतकऱ्यांची उन्हाळी पिकांची चिंता मिटली आहे.

### सिंचन विहिरींची स्थिती

**ग्रामपंचायतींची संख्या-५४७**
**सिंचन विहिरींचे उद्दिष्ट-८२०५**
**ॲपमध्ये नोंदणी केलेले अर्ज-४५५४**
**पं. स. स्तरावर प्रस्ताव-८७०६**
**वर्क कोड जनरेट-८७०६**
**तांत्रिक मान्यता-६६७१**
**प्रशासकीय मान्यता-६६७१**
**वर्क ऑर्डर-६४५०**
**काम सुरू-८६७**

### शेतकऱ्यांची समस्या सुटेल

**इतर योजनांच्या तुलनेत या योजनेत चांगले अनुदान मिळते. आता तर हा आकडा पाच लाखांवर गेला आहे. जुन्या कामांना त्या मंजुरी प्रमाणेच निधी मिळणार आहे. त्यामुळे ही कामे करताना शेतकऱ्यांना कोणतीच अडचण नाही.**

जिल्ह्यात या कामांना सुरुवातीला गती होती. पण सध्या ६ हजारांवर विहिरींची कामे ठप्प पडली आहेत. सध्या रब्बी हंगामाची कामे सुरु असल्याने मजुर मिळत नसल्याने विहिरीचे खोदकाम करण्यास अडचण येत आहे.



### रेटा लावण्याची गरज

केवळ मजूर उपस्थितीची समस्या असते. त्यावर मात केली तर ही कामे वेळेत करणे शक्य आहे. आता रब्बीचा हंगामही निघत आल्याने शेतकऱ्यांना ही कामे करण्याची संधी आहे. प्रशासनानेही त्यासाठी रेटा लावण्याची गरज आहे.

### रब्बी हंगाम निघाल्याने गतीची अपेक्षा

शासनाने रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. त्यात सिंचन विहिरीसारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनेला प्राधान्य दिले तर शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.

### अनुदान आहे चांगले

इतर योजनांच्या तुलनेत या योजनेत चांगले अनुदान मिळते. आता तर हा आकडा पाच लाखांवर गेला आहे. जुन्या कामांना त्या मंजुरी प्रमाणेच निधी मिळणार आहे. त्यामुळे ही कामे करताना शेतकऱ्यांना कोणतीच अडचण नाही. केवळ मजूर उपस्थितीची समस्या असते. त्यावर मात केली तर ही कामे वेळेत करणे शक्य आहे.

### रब्बी हंगाम निघाल्यानंतर गतीची अपेक्षा

शासनाने रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. त्यात सिंचन विहिरीसारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनेला प्राधान्य दिले तर शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. आता रब्बीचा हंगामही निघत आल्याने शेतकऱ्यांना ही कामे करण्याची संधी आहे. प्रशास-नानेही त्यासाठी रेटा लावण्याची गरज आहे.

# नियमबाह्य कंत्राटातून कृउबासचे मालसुतो कार्यक्रम

## पणन विभागाच्या आदेशाला केराची टोपली,काटी बाजार कंत्राट प्रकरण



**गोंदिया:-** पणन मंत्रालयाने जिल्हा उपनिबंधक यांच्या नियंत्रणाखाली काटी बाजाराचे लिलावाची प्रक्रिया करावी, असे आदेश दिले. मात्र या आदेशाला गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केराची टोपली दाखवित पर-स्पर थातुरमातुर प्रक्रिया दाखवून बाजाराचे कंत्राट दिले आहे. विशेष म्हणजे शासनाच्या आदेशाली अंमलबजावणी तर सोडाच, सदर कंत्राटाला स्थगिती देण्याच्या सुचना असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे कंत्राटाच्या माध्यमातून कृषी उत्पन्न बाजार समितीचे की, संचालक मंडळाचे चांगभलं, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याच बरोबर कृउबासमध्ये सुरू असलेल्या मनमर्जी कारभारही चांगलाच चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे या कारभाराला अभय कुणाचे? असे प्रश्नही उपस्थित केले जात आहे.

सन २०२३ मध्ये कृउबासच्या झालेल्या निवडणुकीत नवे संचालक मंडळाला सत्तेची किल्ली मिळाली. नव्या संचालक मंडळाच्या हाती सत्ता येताच मनमर्जी कारभाराचा परिचय देणे सुरू झाले आहे. कृउबासच्या नियंत्रणाखाली सुरू असलेल्या काटी बाजाराला ठेका पद्धतीत देण्याचा ठराव ८ नोव्हेंबर २०२३ रोजी मासिक सभेत घेण्यात आले. सदर ठराव उपनिबंधक यांच्याकडे २८ नोव्हेंबर रोजी सादर करण्यात आला.

उपनिबंधक कार्यालयाने ठराव पणन संचालकाकडे व त्यानंतर पणन संचालकाने पणन सचिवाकडे २६ डिसेंबर २०२३ रोजी प्रस्तावित केले. दरम्यान पणन मंत्रालयाने मागील ३ वर्षाचा उत्पन्न लक्षात घेवून त्यापेक्षा २० ते २५ टक्के अधिक उत्पन्न होईल, या अनुषंगाने दिलेल्या अटीनुसार निविदा व कंत्राट प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक यांच्या नियंत्रणाखाली पुर्ण करण्यात यावी, असे आदेश ५ मार्च २०२४ रोजी दिले. दरम्यान या प्रक्रियेवर संचालक धनलाल ठाकरे यांनी आक्षेप नोंदविला तसेच मंत्रालयाकडे तक्रार दाखल केली. यावर ५ मार्च २०२४ रोजी पणन मंत्रालयाने सदर प्रक्रियेवर स्थगितीचे आदेश दिले तसेच जिल्हा दुय्यम निबंधकाला चौकशी करून तसे प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना केल्या. त्यानुरूप २४ एप्रिल २०२४ रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान तक्रारीतून करण्यात आ-लेले आरोप सत्य असल्याचे समोर आले. त्याच बरोबर उपनिबंधक गोंदिया कार्यालयाशी कसलाही व्यवहार न करता, संचालक मंडळाने परस्पर कंत्राट दिल्याचेही अभिप्राय चौकशी अधिकाऱ्यांनी नोंदविले. तर दुसरीकडे कृषी उत्पन्न बाजार समितीने सर्व कागदपत्राचा खेळ खेळून मंत्रालयाच्या आदेशाला वेशीवर टांगून परस्पर १५ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवशंकर अग्रवाल यांना १४ लाख २४ हजार काही रुपये १ वर्षासाठी काटी बाजाराचे कंत्राट दिले. नियमबाह्य केलेली प्रक्रिया आणि मंत्रालयाच्या आदेशस्वरुप सदर कंत्राटदाराला स्थगिती असतांनाही १८ फेब्रुवारी २०२४ते १७ फेब्रुवारी २०२५ पर्यंतचा कंत्राट सुरूच ठेवला. एकंदरीत गोदिया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने या प्रकारातून आपला मनमर्जी कारभाराचा परिचय दिला आहे. हा गैरप्रकार उघडपणे दिसून येत असतांनाही जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून बघ्याची भूमिका बजावली जात आहे. त्यामुळे काटी बाजाराच्या कंत्राटात मोठे घबाड लपल्याचा आरोपही होत आहे. या प्रकरणाची चौकशी करून गोदिया कृउबासच्या संचालक मंडळावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. एवढेच नव्हेतर गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुरू असलेला मनमर्जी कारभाराला एका मोठ्या जनप्रतिनिधीचे अभयदान असल्याचीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे महम करे सो कायदा या म्हणी प्रमाणे मालसुतो कार्यक्रम सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

### प्रक्रियेतही पत्र व तारखांचा घोळ

**नियमानुसार पणन विभागाने दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे बाजाराचे लिलाव होणे गरजेचे असते. त्यातच पणन मंत्रालयाने दिलेल्या सुचनेचे पालनही करणे गरजेचे होते. मात्र जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला वाऱ्यावर ठेवून कृउबासच्या संचालक मंडळाने परस्पर काटी बाज-राचे कंत्राट दिले आहे. १० फेब्रुवारी २०२४ रोजी सदर कंत्राटदार कृउबासला कंत्राटाच्या संदर्भात निविदा सादर करतो, किमान तीन निविदा आल्यानंतर त्याची प्रक्रिया पुढे होते, त्यातही निविदा प्रसिद्धी, मुदत, स्विकारणे, निविदा उघडणे या सर्व बाबी पुर्ण करणे गरजेचे असते. मात्र या सर्व प्रक्रियांना बगल देत, १५ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवशंकर अग्रवाल यांना कंत्राट देण्यात आले. तत्पूर्वी बाजाराचे आदेश १२ फेब्रुवारी २०२४ रोजी काढण्यात आले होते. विशेष म्हणजे, कंत्राटदाराने करारनाम्याची पूर्व तयारी ९ फेब्रुवारी २०२४ रोजीच केल्याचे सादर केलेल्या मुद्रांकाच्या तारेखवरून दिसून येत आहे. यामुळे कृउबासकडून कंत्राट देण्यासाठी पत्रांचा व तारखांचा खेळ खेळण्यात आल्याचा प्रकारही उघडपणे दिसून येत आहे.**

**नियमांना डावलून विशेषतः पणन मंत्रालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखवून तसेच प्रक्रिया पूर्ण न करताच परस्पर कंत्राट देण्यात आले. या बाबतची तक्रार आपण जिल्हा उपनिबंधक, संचालक पणन व पणन म त्रालयाकडे केली आहे. कंत्राटाला स्थगिती असूनही मुरजोरपणाचा परिचय देत. संचालक मंडळाने वर्षभर ते कंत्राट नियमित ठेवले. यामुळे या सर्व प्रक्रियेत मोठे घोळ असल्याचा उघडपणे पहावयास मिळत आहे. शासनाकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आपण केली आहे. त्याच बरोबर या संदर्भात पत्र व्यवहारही सातत्याने केले जात आहे.**

**-धनलाल ठाकरे, तक्रारकर्ता संचालक कृउबास, गोंदिया**

# रामटेक येथे साकारणार चित्रनगरी



**नागपूर :-** रामटेक येथील नियोजित चित्रनगरीसाठी महसूल विभागाने सांस्कृतिक विभागास तत्काळ जागा हस्तांतरीत करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने या चित्रन-गरीचे निर्माण होत असून या प्रकल्पासाठी सांस्कृतिक विभागाने तत्वत: मान्यता दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती सभागृहात चित्रनगरीबाबत आढावा घेतांना ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री आशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यावेळी उपस्थित होते. रामोजी फिल्म सिटीचे संचालक राजीव जालनापूरकर यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभाग घेतला.

रामटेक येथील खिंडसी तलावाजवळ चित्रनगरी तयार करण्यात येणार आहे. चित्रीकरण व इतर बाबींसाठी ही जागा योग्य असून हे ठिकाण वनक्षेत्राशी जोडले असल्याने पर्यटनास भरपूर वाव आहे. यातून रोजगार निर्मिती होईल. चित्रनगरीसाठी प्रशिक्षीत मनुष्यबळ तयार करण्यासाठी येथे प्रशिक्षण केंद्र तयार करण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले. चित्रीकरणासाठी लोकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. चित्रनगरीसाठी या क्षेत्रातील लोकांनी कार्यशाळा घ्याव्यात, असे ते म्हणाले.

या प्रकल्पामुळे मध्यप्रदेश छत्तिसगड येथील निर्मात्यांना डाक्युमेंटरी, लघुपट तयार करण्यासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले.ही चित्रनगरी नागपूर विमानतळ येथून अवघ्या ४० किलोमिटरवर आहे. याभागात रिसार्ट भरपूर आहेत. यासर्व बाबींचा लाभ निर्मात्यांना होईल, असेही त्यांनी सांगितले.

### जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२४पुस्तिकेचे विमोचन

**गोंदिया:-**जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२४ या पुस्तिकेचे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते आज विमोचन करण्यात आले. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, गोंदिया उपसंचालक सुनील धोंगडे यांनी सदर पुस्तिका सादर केली. ही पुस्तिका अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संकेतस्थळावर, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, गोंदिया यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# डिजीटल शाळा कलपाथरीला डॉ.वानखेडे यांची भेट



विद्यार्थ्यांना दिली स्वच्छतेची माहिती

**गोंदिया :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुखांना जलजीवन मिशन व स्वच्छ भारत कार्यक्रम अंतर्गत झालेले कामकाजाची पाहणी करण्याबाबत मार्गदर्शक सुचना दिल्यात. त्यानुसार १४ फेब्रुवारी रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी गोरे-गाव तालुक्यातील हौसीटोला, कन्हारटोला व कलपाथरी गावाला भेटी देवुन ग्रामपंचायत, अंगणवाडी व शाळांना भेटी दिल्या. दरम्यान कलपाथरी येथील डिजीटल शाळ-ेती विद्यार्थ्यांनी हितगुंज करून स्वच्छतेचे धडे दिले.

डॉ. वानखेडे यांनी मुलांना सोप्या भाषेत शाळांमध्ये संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी पूर्णपणे हात धुणे हा एकमेव प्रभावी मार्ग आहे. मुलांना धुण्याच्या पद्धती आणि साबण आणि स्वच्छ वाहत्या पाण्याने किमान २० सेकंद हात एकमेकांशी घासून घेण्याबाबत मार्गदर्शन केले. नेहमी हात धुवाः शौचालय वापरल्यानंतर. हात धुणे, दात घासणे आणि आंघोळ करणे यासारख्या मूलभूत स्वच्छता दिनचर्या, मुलांना सोप्या भाषेत समजुन सांगितल्या. मुलांना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व समजवुन सांगितले. जंतांचा प्रादुर्भाव थोपवण्यासाठी जेवण्याच्या आधी हात स्वच्छ धुवावेत, भाज्या व फळे खाण्यापूर्वी व्यवस्थित धुवाव्यात, स्वच्छ व उकळलेले पाणी प्यावे, पायात चपला/बूट घालावेत, नखे नियमित कापावीत ठेवावीत, शौचालयांचा स्वच्छ वापर करावा, उघड्यावर शौचास बसू नये, शौचालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच, ग्रामविकास अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाम, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरजन अग्रवाल, जिल्हा आयईसी अधिकारी प्रशांत खरात, तालुका आरोग्य सहा. रवि पटले आदी उपस्थित होते.

# कचारगड विकास आराखड्याच्या तीन महिन्यांनी घेणार आढावा घेणार-आदिवासी मंत्री अशोक उईके



**गोंदिया:-** कचारगड हे देशभरातील आदिवासींचे श्रद्धास्थान आहे. येथे आमच्या पूर्वजांचा वास आहे. या ठिकाणी देशातील १८ राज्यांतील आदिवासी भाविक लाखोंच्या संख्येने येतात. अशात या तीर्थक्षेत्राचा विकास होणे गरजेचे आहे.त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून कचारगड विकासाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर येणाऱ्या भाविकांची सोयी सुविधा दृष्टिकोनातून कामाला सुरुवात केली जाईल. तसेच या विकास कामांचा आढावा घेण्याकरीता दर तीन महिन्यांनी येथे भेट देणार असल्याची अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अश-ोक उईके यांनी दिली.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके हे बुधवारी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी कचारगड येथे पोहोचत दिवसभर विविध कार्यक्रम ांत सहभाग घेतला. त्यानंतर पत्रकारपरिषदेत बोलत होते.

कचारगड हे आदिवासी सम ाजाची काशी असून या स्थळाच्या विकासाकरीता वनविभागाकडून जी अडचण होती, ती आता दूर झालेली आहे. त्या दृष्टीने पुढच्या यात्रेपर्यंत याठिकाणी सुंदर असा विकसित परिसर बघावयास मिळेल. सोबतच कचारगड येथे येणाऱ्या भाविकांसाठी भक्त निवास तसेच आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या विकासकामांच्या संकल्प पुर्तीच्यावेळी महामहिम राष्ट्रपती यांनाही शुभारंभ करण्याकरीता आणण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगितले. पत्रपरिषदेला आमदार संजय पुराम, जनजाती समितीचे अध्यक्ष नाजुक कुंभरे, सचिव लोकनाथ तितराम आदी उपस्थित होते.

# ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवा ऑक्सिजनवरच

## उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा द्या,भारतीय जनकल्याण फाउंडेशनने घेतली दखल

**आमगाव :-** येथील ग्रामीण रुग्णालयात विविध समस्या असून हे रुग्णालय ऑक्सिजनवर सुरू असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील लोकसंख्येत बरीच वाढ झाली असून त्या तुलनेत हे ग्रामीण रुग्णालय अपुरे पडत आहे. त्यामुळे तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणी तालुकावासीयांनी केली आहे.

येथील ग्रामीण रुग्णालयात वर्षाकाठी ८० हजारांपेक्षा अधिक रुग्ण उपचार घेतात. पण शासनाकडून अद्यापही आरोग्य संयंत्र व कर्मचारी यांची पूर्तता केलेली नाही. रुग्णालयाला अत्याधुनिक व्यवस्था निर्माण करून उपजिल्हा रुग्णालय निर्माण व्हावे यासाठी काही लोकांनी पुढाकार घेतला होता. आमगाव येथे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करावी अशी मागणी आहे.



### आमगावला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा द्या

**येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या. तसेच रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांची होणारी परवड दूर करण्याची मागणी भारतीय जनकल्याण फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. सुभाष आकरे, यशवंत मानकर, उत्तम नंदेश्वर, सेवा सहसंस्थेचे संचालक राजू फुंडे, विक्की मानकर, योगेश मानकर, आकाश रामटेके, नितेश गणवीर, प्रमोद बोहरे, नरेंद्र निखारे, देवाशिष मेंढे यांनी केली आहे.**

### खासगी रुग्णालयाचा घ्यावा लागतो आधार

**तीन राज्याच्या सीमेवर असलेल्या आमगाव ग्रामीण रुग्णालय व बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांना आवश्यक असलेल्या सुविधा अद्यापही उपलब्ध नाही. त्यामुळे येथील रुग्ण सेवा ऑक्सिजनवर आहे. परिणामी रुग्णांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा ला-गतो. रुग्णालयात सिटी स्कॅन, एक्सरे लॅब तपासणी संयंत्र उप-लब्ध नाहीत तर या सुविधांसाठी लागणारे कर्मचाऱ्याची नियुक्ती प्रशासनाने केली नाही.**



### आदिवासी नृत्याने वेधले डोंगरवासीयांचे लक्ष

**बिरसा मुंडा यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमाचे औचित्य साधून रॅली काढण्यात आली. यात आदिवासी कला, संस्कृतीचे दर्शन घडविणारे नृत्य सादर करण्यात आले. या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.**

# भाषा व संस्कृतीच्या रक्षणासाठी लढणार-आ.बडोले

**सडक-अर्जुनी:-** गोंडी भाषेचा आठव्या सूचित समावेश करणे आणि जाती-जमातीच्या नोकर भरतीसाठी विशेष मोहीम राबविण्यास सरकारला भाग पाडण्याचा प्रयत्न करू. आदिवासींची भाषा व संस्कृतीच्या रक्षणासाठी लढणार, अशी ग्वाही आ. राजकुमार बडोले यांनी दिली.

तालुक्यातील डोंगरगाव येथे क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे अनावरण आणि आदिवासी समाजप्रबोधन कार्यक्रम रविवारी पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पुतळा अनावरण आ. राज-कुमार बडोले, यु. डी. उके यांच्या हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी चेतन उईके, ज्येष्ठ पत्रकार भूपेंद्र गणवीर, सभापती चेतन वडगाये, सरपंच पोर्णिमा गणवीर, तुळशीराम शिवणकर, तुका कोचे, दिनेश हुकरे, संजय चिचाम, टेकू शेंडे उपस्थित होते. आ. बडोले म्हणाले, आदिवासी समाजाच्या मागण्यांच्या पूर्ततेचा प्रयत्न करणार. वैनगंगा नदीचे पाणी डोंगरगाव, परसोडी, वडेगावसह माझ्या मतदारसंघातील अनेक गावांत आणणार आहे. या संदर्भात दोन बैठका झाल्या. धाबेवाडा उपसा सिंचन योजना, डोंगरगावचा रखडलेला पूल आणि पिण्याचे पाणी उमरझरी प्रकल्पातून पुरवण्याचे जाहीर केले.

बिरसा मुंडा यांच्या जी-वनावरही प्रकाश टाकला. समाजगृहाचेही आश्वासन दिले. ज्येष्ठ पत्रकार भूपेंद्र गणवीर म्हणाले, बिरसा मुंडा केवळ २४ वर्ष ७ महिने जगले. या अल्पकाळात आदिवासींना आत्मरक्षण, आ-पले अधिकार, स्वाभिमान, जल, जंगल, जमिनीच्या अधिकाराबाबत जागृत केले. जमीनदार, सावकार व ब्राह्मणशाहीविरोधात लढल्याचे सांगितले.

# २१ हजार विद्यार्थी आधारपासून वंचित

## जिल्ह्यातील ६०० विद्यार्थ्यांची अडचण,वर्ष संपत आले तरीही विभागाकडून निधीचा पत्ताच नाही

**वर्धा :-** महाराष्ट्र शास-नाने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मुला-मुलींची प्रत्येकी १०० क्षमतेची दोन वसतिगृहे मंजूर केली. या वसतिगृहातात ज्यांना प्रवेश मिळाला नाही, अशांकरिता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरू केली. या योजनेंतर्गत एका विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षासाठी ६० हजार रुपये देण्यात येणार आहेत; पण आता वर्ष संपत आले तरीही ओबीसी विभागाने निधीच दिला नसल्याने जिल्ह्यातील ६०० विद्यार्थ्यांचा आधारच हिरावल्याचे चित्र आहे.

राज्यभरात ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्यामुळे ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळत नाही अशा मुला-मुलींसाठी-बाहेरगावी शिक्षण घेण्यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरू केली. यांचे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ६०० विद्यार्थी, विद्यार्थिनींना प्रत्येकी वर्षाकाठी ६० हजार रुपये देण्यात येणार आहेत.

या ज्ञानज्योती आधार योजनेचे तब्बल दोन वर्षांनंतर शासनाच्या जिल्हास्तरीय ओबीसी सहायक संचालकांनी अर्ज घेऊन त्याची निवडही केली; परंतु आता वर्ष संपत आले असताना या विद्यार्थ्यांना अजूनही या आधार योजनेचे पैसे मिळाले नाहीत.

या योजनेच्या भरवशावर ज्या गरीब ओबीसी विद्यार्थ्यांनी शहरात शिक्षणासाठी राहून भाड्याने खोली घेऊन शिक्षण सुरू केले त्यांना या योजनेत पात्र होऊनही अजून आधार योजनेतून घरभाडे व भोजन भत्त्यापोटी वर्षभराचे ६० हजार रुपये मिळाले नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांवर आता उपासमारीची व शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ आली आहे.



### २१ हजार विद्यार्थ्यांची निधी अभावी झालीय अडचण

**या योजनेचा लाभ घेणारे राज्यभरात २१ हजार विद्यार्थी असून त्यांची अडचण वाढली आहे. त्याकरिता १०२ कोटींच्या निधीची गरज आहे.**

### जिल्ह्याकरिता ३ कोटींच्या निधीची आहे आवश्यकता

**जिल्ह्यामध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचे एकूण ६०० लाभार्थी आहेत. हे विद्यार्थ्यांनी या योजनेच्या आधारावर शहरात राहून शिक्षण घेत आहे. पण, आता वर्ष संपत आले तरीही त्यांना शासनाकडून निधी मिळाला नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. जिल्ह्याकरिता एकूण ३ कोटींची गरज असून राज्य शासनाच्या ओबीसी विभागाने तो तातडीने अदा करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.**

### आंदोलनाने आलीय जाग

**अशीच अवस्था ओबीसींच्या शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थिनींची झाली होती. मागील पाच महिन्यांपासून या विद्यार्थ्यांना भोजनासाठी द्यावयाचा दरमहा ४ हजार ५०० रुपये भोजन भत्ता न दिल्यामुळे त्यांची कुचंबणा होत होती. गरीब ओबीसी मुले बाहेर शिवभोजनवर १० रुपयात एकवेळ भोजन करून अर्थपोटी राहत होती. त्यावेळी ओबीसी संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिल्यावर व ओबीसी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आंदोलनाला सुरुवात केल्यावर शासनाने ३१ जानेवारीला ८ कोटी मंजूर करून त्यांना भोजन भत्ता देण्याची कार्यवाही सुरू केली आहे.**

### महात्मा फुले समता परिषदेच्या नेतृत्वात शासनाकडे मागणी

**महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष प्रा. दिवाकर गमे, जिल्हा संघटक विनय डहाके, विशाल हजारे, नीळकंठ राऊत, अमोल ठाकरे, कविता मुंगळे, किरण कडू, अमृतराव शेंडे, नरेंद्र चर्जन, अविनाश गमे, प्रवीण मख, भरत चौधरी, केशव तितरे, डॉ. अविनाश गवळी यांनी निवेदन दिले.**

### शासन ओबीसींबाबत उदासीन, रस्त्यावर उतरल्यावर न्याय...

**राज्य शासन नेहमीच ओबीसींच्या प्रश्नांबद्दल उदासिन असल्याचे दिसून येत आहे. तो विद्यार्थ्यांचाही प्रश्न असला तरीही त्यांना रस्त्यावर उतरल्याशिवाय न्यायच मिळत नाही. आधी वसतिगृह तर आता आधार योजनेच्या निधीकरिता आंदोलनाची भूमिका घ्यावी लागणार असल्याचे सांगण्यात आले.**

### ३ मार्चपासून आंदोलन करण्याचा इशारा...

**येत्या १५ दिवसांत ओबीसी विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचे वर्षभराचे पैसे या विद्यार्थ्यांना ओबीसी विभागाने दिले नाहीत, तर ३ मार्चपासून हा निधी मिळण्यासाठी आंदोलन करू, असा इशारा महात्मा फुले समता परिषदेने ओबीसी विभागाला दिला आहे.**

# पांगोली नदीचा अधिसूचित झाला समावेश

**गोंदिया :-** जिल्ह्यातील अधिसूचित नद्यांच्या यादीत शहराजवळून वाहणाऱ्या पांगोली नदीचा समावेश नव्हता. त्यामुळे शासनाच्या कोणत्याही अभियानात पांगोली नदीला वगळण्यात येत होते. शासनाने पांगोली नदीचा अधिसूचित नद्यांच्या यादीत सम ावेश करावा, अशी वारंवार मागणी पांगोली नदी वाचवा अभियान संघर्ष कृती समिती शासनाकडे करीत होती. या प्रयत्नाला यश आले असून पांगोली नदीचा समावेश गोंदिया जिल्ह्यातील अधिसूचित नद्यांमध्ये झाली आहे.

पांगोली नदीच्या पु-नरुज्जीवन, संरक्षण, संवर्धन व विकासासंदर्भात ४४ कोटी रुपयांचा जलसंधारण विभागाने नदी पुनरुज्जीवनासंदर्भात तयार केलेला डीपीआर कालबाह्य व त्रुटी पूर्ण असल्याने नदीचे पुन्हा सर्वेक्षण करून नवीन सर्वांगीण डीपीआर तयार तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे. गोंदिया पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनाली सोनुले यांनी नदीचे पुन्हा सर्वेक्षण करून नवीन डीपीआर तयार करण्याची प्रकिया सुरु होणार असल्याचेही पांगोली नदी वाचवा अभियान समितीला कळविल्याचे समितीचे तिर्थराज उके यांनी सांगितले.

यासंदर्भात मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांच्याकडूनही पांगोली नदीचे त्वरित पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात स्थानिक कार्यालयाला निर्देश देण्यात आले आहेत.

गोरेगाव तालुक्याच्या तेढा गावातील सरोवरातून पांगोली नदीचा उगम झाला. गोंदिया तालुक्यातील खातिया गावाजवळ छिपिया येथे मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट सिमारेषेवरील वाघ नदीत तीचे संगम होते.गोंदिया व गोरेगाव तालुक्यातील ६० किमी क्षेत्र, आमगाव तालुक्यातील १५ किमीचे क्षेत्र या नदीने व्यापले आहे. गोंदिया, गोरेगाव तालुक्यातील शेकडो शेतकरी पांगोलीच्या पाण्यावर शेती पिकवितात. आमगाव तालुक्यातील काही गावांनाही या पाण्याचा लाभ होतो. मात्र, आजघडीला या नदीची अवस्था अतिशय बिकट आहे. विषारी रसायने मिसळली जात असल्याने ही नदी प्रदूषित झाली आहे.



### बालाघाट सीमारेषेवरील वाघ नदीत संगम

**गोरेगाव तालुक्यातील तेढा गावातील सरोवरातून पांगोली नदीचा उगम झाला. गोंदिया तालुक्यातील खातिया गावाजवळ छिपीया येथे मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट सीमारेषेवरील वाघ नदीत तिचे संगम होते. गोंदिया व गोरगाव तालुक्यातील ६० किमी क्षेत्र, आमगाव तालुक्यातील १५ किमी क्षेत्र या नदीने व्यापले आहे, या दोन्ही तालुक्यांतील शेकडो शेतकरी पांगोली नदीच्या पाण्यावर शेती पिकवतात.**

### पुनरुज्जीवन, संरक्षण, संवर्धनाचा मार्ग मोकळा

**अनेक कारणांमुळे या नदीची अवस्था बिकट होत चालली होती. यासंदर्भात शासनाने पांगोली नदीचा अधिसूचित नद्यांच्या यादीत सम ावेश करावा, अशी वारंवार मागणी पांगोली नदी वाचवा अभियान संघर्ष कृती समिती शासनाकडे करीत होती, दरम्यान त्यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून पांगोलीच्या पुनरुज्जीवन, संरक्षण, संवर्धन व विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.**